मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर ❯❯ शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४ ❯ वर्ष- २९ ❯ अंक - ११२ ❯❯ पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ किंमत : ३ रुपये



कोणत्याच नेत्याने मुख्यमंत्रीपदावर दावा करु नये!
पान ३

## 2 अग्नीवीर जवानांचा नाशिकमध्ये प्रशिक्षणादरम्यान मृत्यू

**नाशिक :** नाशिकमध्ये भारतीय सैन्यातील दोन अग्नीवीरांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आर्टिलरी सेंटरमध्ये स्फोट झाल्याने दोन अग्निवीरांचा मृत्यू झाला आहे. सरावावेळी फायरिंग करत असताना स्फोट झाल्याने अग्निवीरांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार तोफेचा गोळा लोड करत असताना ब्लास्ट झाला. यामध्ये अग्नीवीर गोहिल सिंग (वय 20) आणि सैफत शित (वय 21) गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने देवळाली येथील सैनिकी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## आमच्याकडे कमिटी नाही थेट डीबीटी

# कोणी 'माय का लाल' आला तरी 'लाडकी बहीण योजना' बंद पडणार नाही!

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी
**ठाणे**

महाराष्ट्रातील सावत्र भाऊ लाडकी बहिण योजना बंद करण्याच्या मार्गावर असल्याची टीका, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. मात्र, कोणीही 'माय का लाल' आला तरी योजना बंद पडणार नसल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. पहिल्या अडीच वर्षात महाविकास आघाडीचे सरकारमधील कार्यकाळ पहा आणि मागच्या दोन सव्वा दोन वर्षात आम्ही केलेला कामाचा कार्यकाळ पहा. फरक तुम्हाला स्पष्ट दिसेल, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

राज्य सरकारच्या सर्व योजनांमध्ये आडवे येण्याचे काम विरोधक करत आहेत. मात्र त्यांना आडवे करण्याचे कामच जनता करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. आमच्या कार्यकाळात एकही भ्रष्टाचाराचा आरोप झालेला नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. हरियाणा मध्ये आमचा विजय होणार असे ढोल वाजत होते. मात्र हरियाणाच्या जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवली. आता महाराष्ट्रात देखील तसेच होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

### मी गरिबी पाहिलीय, म्हणूनच बहिणींसाठी निर्णय घेतला

मी गरीब कुटुंबातून आलो आहे. मी गरीबी पाहिलेली आहे. माझी आई कशी तगमग करायची. कशा पद्धतीने कुटुंब चालवायची, हे मी पाहिले आहे. त्यामुळे माझ्याकडे अधिकार येताच, सर्वात आधी आमच्या लाडक्या बहिणीसाठी हा निर्णय घेतला. लाडक्या बहिणींना पैसे दिले जात आहेत. हा निर्णय आम्ही का घेऊ नये? असा प्रतिप्रश्न त्यांनी विचारला आहे. हे गोरगरिबांचे सरकार आहे. अधिकाऱ्यांनी देखील सर्वसामान्यांचा विचार करूनच निर्णय घेतला पाहिजे. अन्यथा एकही अधिकारी जागेवर ठेवणार नाही, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे. हे जनतेचे राज्य आहे. सर्वसामान्य व्यक्तीचे राज्य असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

### नवी मुंबई विमानतळ आणि नैना हे महाराष्ट्राला पॉवर हाऊस बनविणारे प्रकल्प



**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प येथे भारतीय वायुदलातर्फे सी-295 एअरक्राफ्टची लॅंडिंग आणि सुखोई-30 एअरक्राफ्टची फ्लायपास्ट चाचणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुरलीधर मोहोळ, नागरी उड्डाण राज्यमंत्री, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या पार पडली. त्यानंतर सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी, नवी मुंबई येथे पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सिडकोच्या 26 हजार 502 सदनिकांच्या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ, महाराष्ट्र भवन, नैना नगर रचना परियोजना 8 ते 12 मधील पायाभूत सुविधा विकास कामे, ठाणे नागरी पुनरुत्थान योजना (नवीन 3 हजार 833 सदनिका), पश्चिम परिघीय (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) मार्ग यांचे भूमिपूजन; 18 होल्सच्या आंतरराष्ट्रीय खारघर व्हॅली गोल्फ कोर्स व सेंटर ऑफ एक्सलन्स येथील दर्शक गॅलरी यांचे उद्घाटन आणि ईर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी सिडकोचे अध्यक्ष आमदार संजय शिरसाट, खासदार श्रीरंग बारणे, खासदार नरेश म्हस्के, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार श्रीमती मंदा म्हात्रे, आमदार महेश बालदी, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, गणेश देशमुख, कोसिड, दिलीप ढोले यांच्यासह सिडकोतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इस्राईलचा संयुक्त राष्ट्राच्या शांतता चौक्यांवर हल्ला

### 600 भारतीय जवानांचा जीव धोक्यात



वृत्तसंस्था
**बैरुत**

इस्राईलने शुक्रवारी सकाळी लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्रांच्या चौक्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात संयुक्त राष्ट्रांच्या शांती सैन्यातील तीन सैनिक जखमी झाले. या हल्ल्यानंतर आता संयुक्त राष्ट्रांसह विविध देशांकडून संताप व्यक्त केला जातो आहे. अशातच आता भारतानेही या हल्ल्याबाबत तीव्र प्रतिक्रिया देत चिंता व्यक्त केली आहे.

इस्राईलच्या हल्ल्यानंतर 'ब्लू लाईन'वरील बिघडलेल्या सुरक्षा स्थितीवरून भारताने चिंता व्यक्त केली आहे. खरं तर संयुक्त राष्ट्राच्या परिसराच्या अखंडतेचा सर्वच देशांनी आदर करायला हवा. या परिसरातील शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. हे आपलं कर्तव्य आहे, अशी प्रतिक्रिया भारताकडून देण्यात आली आहे.

संयुक्त राष्ट्र शांती मोहिमेसाठी इस्रायल-लेबनॉन सीमेवर 120 किलोमीटरची ब्लू लाईन तयार करण्यात आली आहे. या ब्लू लाईनवर संयुक्त राष्ट्रे शांती सैन्यातील जवळपास 600 भारतीय सैनिक तैनात आहेत. या ठिकाणी असलेल्या संयुक्त राष्ट्राच्या चौकीवर इस्रायईलने हल्ला केला आहे. त्यामुळे भारताकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. भारताशिवाय इटली, फ्रान्स आणि इंडोनेशियासारख्या देशांनीही इस्राईलला खडे बोल सुनावले आहेत.

दरम्यान, इस्राईलने आज केलेल्या हल्ल्यात इंडोनेशियाचे तीन सैनिक जखमी झाले. मुळात संयुक्त राष्ट्रांनी दक्षिणी लेबनानमध्ये 10 हजार सैनिक तैनात केले आहेत. यात 600 भारतीय सैनिकही आहेत. संयुक्त राष्ट्राच्या चौकीव्यतीरिक्त इस्रायलने गुरुवारी रात्री लेबनॉनची राजधानी बैरुतमधील एका इमारतीवरही हवाई हल्ला केला. या हल्ल्यात 22 नागरिकांचा मृत्यू, तर जवळपास 180 जण जखमी झाल्याची माहिती लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाकडून देण्यात आली आहे.

## महत्त्वाचे

### सयाजी शिंदें राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये

**मुंबई :** अभिनेते सयाजी शिंदे यांनी शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुंबईत आयोजित एका पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ व सुनील तटकरे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. येत्या विधानसभा निवडणुकीत ते पक्षाचे स्टार प्रचारक असतील असे अजित पवार यांनी यावेळी सांगितले. तर पक्षाची धोरणे आवडल्यानेच राष्ट्रवादीत येण्याचा निर्णय घेतला असे सयाजी शिंदे यावेळी म्हणाले.सयाजी शिंदेंच्या पक्ष प्रवेशाच्या वेळी अजित पवार म्हणाले की, मी जास्त चित्रपट पाहत नाही. सजाजीरावांचे काही चित्रपट मी बघितलेत. महाराष्ट्रातल्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही क्षेत्रात नाव कमावले तर त्याचा मला आनंद होतो. अनेक सामाजिक उपक्रमांचे नेतृत्व त्यांनी केले आहे. सयाजीरावांना झाडांची अतिशय आवड आहे. आपले डोंगर बोडखे होत चालले आहेत. तिथे सह्याद्री देवराईच्या माध्यमातून वृक्षारोपणाचे काम ते करतात. राज्यातील सिद्धिविनायक किंवा शिर्डी सारख्या मंदिरांत जर रोपटे हे प्रसाद म्हणून दिले तर लोक त्याला जिवापाड जपतील अशी सूचना त्यांनी केली.

### महादेव बेटींग ॲप : सौरभ चंद्राकरला दुबईतून अटक

**दुबई :** महादेव बेटिंग ॲपचा प्रवर्तक सौरभ चंद्राकरला दुबईत अटक करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) परराष्ट्र मंत्रालयालय व गृहविभागाच्या मदतीने चंद्राकरला दुबईतून ताब्यात घेतले. सहा हजार कोटींच्या महादेव बेटिंग ॲप प्रकरणात तो मुख्य आरोपी आहे.मुंबई - सौरभ चंद्राकर हा महादेव ॲपचा मालक असून तो दुबईतून महादेव बुक बेटींग ॲप चालवत होता. छत्तीसगडमधील भिलाई येथील रहिवासी असलेला सौरभ चंद्राकर तेथे फळांचा रस विकण्याचे काम करायचा. करोना काळात टाळेबंदी असताना तो सट्टेबाजीशी संबंधित व्यक्तींच्या संपर्कात आला. त्याने सट्टाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यानंतर तो ऑनलाइन बेटिंग व्यवसायात उतरला. त्याने हैदराबाद येथे जाऊन ऑनलाइन सट्टेबाजीचे प्रशिक्षण घेतले आणि त्यातून बेटींग ॲपची निर्मिती झाली. त्यामुळे सध्या महादेव बुक ॲप प्रकरण देशात खूप गाजत आहे. यामध्ये काही राजकारणी, पोलीस अधिकारी आणि राजकारण्यांशी संबंधित लोकांचा समावेश असल्याचा संशय आहे. या ॲपची उलाढाल पाच हजार कोटींच्या घरात असल्याचा संशय आहे. या ॲपच्या माध्यमातून अवैध सट्टेबाजी करणाऱ्या संकेतस्थळांना ग्राहक पुरवले जायचे.

## 'एक देश, एक निवडणूक' असंवैधानिक!

### केरळ विधानसभेत ठराव संमत




वृत्तसंस्था
**तिरुअनंतपुरम**

गेल्या अनेक दिवसांपासून देशात 'एक देश, एक निवडणूक' घेण्याची मागणी होत आहे. यासंदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने 'एक देश, एक निवडणूक' या मुद्द्याबाबत अनुकूल मत दर्शवत एक अहवाल सादर केला होता. उच्चस्तरीय समितीचा हा अहवाल गेल्या महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आल्यानंतर त्याला मंजूरी मिळाली आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात सरकार यासंदर्भातील विधेयक मांडू शकते, अशी शक्यता आहे. मात्र त्याआधीच केरळ विधानसभेने 'एक देश, एक निवडणूक' विरोधात ठराव संमत करत त्याला असंवैधानिक म्हटले आहे.

केरळ विधानसभेने केंद्र सरकारला 'एक देश, एक निवडणूक' प्रस्ताव मंजूर करण्याचा निर्णय मागे घेण्याची विनंती करणारा ठराव मंजूर केला आहे. मंजूर झालेल्या ठरावात 'एक देश, एक निवडणूक प्रस्ताव' असंवैधानिक ठरवण्यात आला आहे. केरळ राज्याचे विधिमंडळ कामकाज मंत्री एम. बी. राजेश यांनी म्हटले की, एक देश, एक निवडणकीमुळे देशाच्या संसदीय लोकशाहीच्या वैविध्यपूर्ण स्वरूपाला हानी पोहोचेल. यामुळे विविध राज्यांच्या विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यकाळात कपात करण्याचा मार्ग मोकळा होईल. समिती लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना खर्च मानत आहे, पण तसे करणे लोकशाहीला धरून नाही, असा युक्तिवाद करण्यात आला.

### 'टाटा'च्या अध्यक्षपदी नोएल टाटा

**मुंबई :**टाटा ट्रस्टने दिवंगत उद्योगपती रतन टाटा यांचे उत्तराधिकारी म्हणून नोएल टाटा यांच्या नावावर शिक्कामोर्तब केला आहे. नोएल टाटा हे रतन टाटा यांचे सावत्र बंधू आहेत. रतन यांच्या निधनानंतर ते या पदासाठी एकमेव दावेदार होते. त्यांचे बंधू जिम्मी यांचेही नाव चर्चेत होते. पण ते यापूर्वीच रिटायर झालेत. त्यामुळे बोर्डाने नोएल यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब केले. सुप्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांचे बुधवारी रात्री निधन झाले. ते 86 वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी कुणाची निवड होणार? हा प्रश्न ऐरणीवर आला होता. अखेर या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे. टाटा ट्रस्टने शुक्रवारी बोलावलेल्या एका बैठकीत नवे अध्यक्ष म्हणून नोएल टाटा यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. नोएल टाटा हे सर दोराबजी टाटा ट्रस्ट व टाटा ट्रस्टमधील एक विश्वस्त आहेत. त्यांची कार्यशैली रतन टाटा यांच्याहून फार वेगळी आहे. त्यांना प्रसिद्धीपासून दूर राहून काम करणे आवडते.

## विस्तारवादाने नव्हे, विकासवादानेच सर्व प्रश्न सुटतील!

### १९व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत मोदींचे प्रतिपादन



वृत्तसंस्था
**व्हिएन्टिन**

"मी बुद्धांच्या भूमितून आलो आहे. आम्ही सातत्याने सांगतो की ही वेळ युद्ध करण्याची नाही. जागतिक समस्यांवरची उत्तरं युद्धभूमीवर मिळत नाहीत," असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १९व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत केले. लाओस येथील व्हिएन्टिन या शहरात ते शुक्रवारी बोलत होते. सध्या पंतप्रधान, परिषदेनिमित्त लाओस येथे दोन दिवसांच्या दौऱ्यावर असून या दरम्यान अनेक आंतरराष्ट्रीय नेत्यांची भेट ते घेणार आहेत.

परिषदेत आपल्या भाषणादरम्यान मोदी म्हणाले की जगाच्या पाठीवर आज वेगवेगळ्या ठिकाणी संघर्ष सुरु आहे. याचा सर्वाधिक फटका आशियातील दक्षिणेतील देशांना बसतो आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करणे हे सगळ्यांच्याच हिताचे आहे. याच सोबत, इंडो पॅसिफिक हा प्रदेश सर्वसमावेशक आणि तणावमुक्त राहील याबद्दल आपण प्रयत्नशील असले पाहीजे, असे म्हणत त्यांनी चीनला इशारा दिला आहे. विकासावादावर भाष्य करत, मोदी म्हणाले संयुक्त राष्ट्रांच्या समुद्राच्या कायद्याचे पालन देशांनी करायला हवे जेणेकरुन, सर्व देशांचे स्वातंत्र्य अबाधित राहील.

### संवाद साधून समस्या सोडवणे गरजेचे!

जागतिक शांततेसाठी आणि सुरक्षतितेसाठी दहशतवादाचा मुकाबाला करणे गरजेचे आहे, असे मत मोदी यांनी व्यक्त केले. दहशतवादाच्या आव्हानाला कमी लेखुन चालणार नाही. मानवतेच्या रक्षणासाठी सगळ्यांनी एकत्र येऊन दहशतवादाशी दोन हात करणे गरजेचे आहे. सायबर क्षेत्र, सागरी आणि अवकाश क्षेत्रात एकमेकांना सोबत करत, साम्यर्थ वाढवणे गरजेचे आहे. मानवतावादी दृष्टीकोन ठेवत, संवाद साधून समस्या सोडवणे गरजेचे आहे. विश्वबंधुत्वाची कास धरत, भारत आपल्यापरीने यामध्ये सहभाग नोंदवत राहील, अशी ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी यावेळी दिली.



## शिवसेना शाखा 12 तर्फे "प्रथम ती, जागर स्त्री शक्तीचा! योग नवदुर्गा दर्शनाचे आयोजन

**मुंबई :** शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) मागाठाणे विधानसभा शाखा क्रमांक १२ आयोजित"प्रथम ती, जागर स्त्री शक्तीचा! योग वदुर्गा दर्शनाचा याचे आयोजन करण्यात आले होते. विभागातील ९ बस भरुन महिलांना देवीपाडाची गावदेवी ,डहाणू ची महालक्ष्मी देवी, वसई विरार ची वज्रेश्वरी देवी,पालघरची शीतलादेवी, या मंदिरांचे दर्शन या यात्रेत करण्यात आले. या यात्रेचा शुभारंभ आमदार, शिवसेना सचिव मिलिंद नार्वेकर यांच्या शुभहस्ते मागाठाणे बोरिवलीत करण्यात आला. या प्रसंगी उपनेते विनोद घोसाळकर, उपनेत्या सौ संजना घाडी,माजी आमदार विलास पोतनीस, विभागप्रमुख उदेश पाटेकर, विभागसंघटक सुजाता शिंगाडे, विधानसभा प्रमख अशोक म्हामुणकर, माजो नगरसेविका सुजाता पाटेकर, मिलिंद साटम, विजय राजंने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य व मागाठाणे विधानसभा निरीक्षक शशिकांत झोरे सिनेट सदस्य यांनी केले. संयोजक शुभदा शिंदे, सारीका झोरे,सचिन मोरे, शुभदा सावंत,योगेश देसाई माधुरी खानविलकर हे होते.



# थोडक्यात

## दादर मध्ये वधू-वर परिचय मेळावा

**मुंबई:** सावंतवाडी संस्थान मराठा समाज, मुंबई, यांच्या वतीने, वधू वर परिचय मेळावा, रविवार दि. २७ ऑक्टोबर २०२४ रोजी संस्थेच्या , नाना साहेब सावंत सभागृह, स्टार मॉल इमारत , ३रा मजला, शिवाजी मंदिर शेजारी, दादर( पश्चिम) येथे सकाळी ९.०० ते दुपारी १.०० वेळेत आयोजित केला आहे. या मेळाव्यास इच्छुक वधू-वरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन, संस्थेचे सरचिटणीस- प्रभाकर परब यांनी केले आहे. नांव नोंदणी व अधिक माहिती साठी संपर्क - नरेंद्र सावंत- ९९८७६८६५३२, बाळ पंडित- ९८६७७९७४४८, समिता परब- ९८६९९५२४७० व दादर पश्चिम येथील संस्थेच्या स्टार मॉल कार्यालयात सोमवार सोडून सायंकाळी ३.०० ते ६.०० या वेळेत संपर्क साधावा.

## मध्य रेल्वे राबवणार 16 हजार 240 कोटींचे प्रकल्प

**मुंबई:** भारतीय रेल्वे अनेक प्रकल्प राबविणार असून, यासाठी १६ हजार २४० कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. विशेष म्हणजे काही प्रकल्प मुंबईतील रेल्वे वाहतूक अद्ययावत होण्यासाठीही हातभार लावणार आहेत. यात काही प्रकल्प मध्य रेल्वेसाठीही राबविण्यात येणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कुर्ला पाचव्या आणि सहाव्या मार्गाचा प्रकल्पावर ८९१ कोटी खर्च होणार आहे. यामुळे अधिक उपनगरीय आणि लांब पल्ल्याच्या सेवा चालविण्यासाठी ट्रॅक क्षमता वाढवते. विद्यमान मार्गांवर गर्दी आणि विलंब कमी होईल आणि मध्य रेल्वेच्या लोकलच्या वक्तशीरपणात सुधारणा होईल. एमयुटीपी ३ अंतर्गत पनवेल कर्जत उपनगरीय कॉरिडॉर प्रकल्प २९.६ ट्रॅक किलोमीटर लांबीचा असून त्याची अंदाजे किंमत २,७८२ कोटी आहे. हा प्रकल्प एमआरव्हीसीद्वारे राबविला जात आहे. बोगदे आणि पुलांचे काम प्रगतीपथावर आहे आणि डिसेंबर-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. 3 ए अंतर्गत कल्याण - आसनगाव चौथा मार्ग प्रकल्प ३२ ट्रॅक किलोमीटर लांबीचा अंदाजे १,७५९ कोटी खर्चाचा आहे.

## पावसामुळे मुंबईच्या हवेत सुधारणा ; तापमानात घट

**मुंबई:** शहर आणि उपनगरांत दोन दिवस झालेल्या पावसामुळे हवा दर्जा निर्देशांकात सुधारणा झाली आहे. काही भागात सातत्याने वाईट दर्जाची नोंद झाली होती. मात्र शुक्रवारी हवेचा दर्जा समाधानकारक होता. मुंबई आणि परिसरात मागील दोन दिवसांपासून पाऊस कोसळला. पावसामुळे मुंबईची हवा स्वच्छ झाली आहे. हवेचा दर्जा गुरुवारी समाधानकारक पातळीवर नोंदवला गेला. याचबरोबर शुक्रवारीही गुणवत्ता निर्देशांक समाधानकारक होता. गेले काही दिवस मुंबईत दिसणारे धुरके दूर होऊन वातावरणात बदल जाणवत आहे. हवा दर्जा निर्देशांकात झालेला हा सकारात्मक बदल पुढील एक – दोन दिवस कायम असेल. गेले अनेक दिवस मुंबईतील हवा खालावली होती.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# बापाणे परिसरातील कांदळवन तोड प्रकरण; एका राजकीय कार्यकर्त्यावर होणार गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ वसई

बापाणे परिसरात राजकीय वजन वापरून मोठ्या प्रमाणात कांदळवनांची तोड करणाऱ्या एका राजकीय कार्यकर्त्यावर लवकरच गुन्हा दाखल होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या व्यक्तीने आपल्या राजकीय संबंधांचा वापर करून स्थानिक प्रशासनावर दबाव टाकत कांदळवन तोड आणि अनधिकृत बांधकामांसाठी मोठ्या प्रमाणात माती भराव केला आहे. यासोबतच, या राजकीय कार्यकर्त्याने आजी, माजी खासदार आणि आमदारांसोबतचे फोटो बॅनरच्या स्वरूपात लावून, आपल्या कारवायांसाठी स्थानिक पातळीवर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.



बापाणे परिसरातील येराची खाडी आणि रेल्वे रुळांच्या लगत असलेल्या कांदळवनांची मोठ्या प्रमाणात तोड करून तेथे अनधिकृत बांधकामांसाठी माती भरली जात आहे. या बांधकामांसाठी मोठ्या प्रमाणात चाळी बांधण्याची प्रक्रिया सुरू आहे, ज्यामुळे पर्यावरणीय नुकसान होण्याची शक्यता आहे. कांदळवन तोडल्यामुळे तेथील जैवविविधता धोक्यात आली आहे, आणि स्थानिक पाणी व्यवस्थापनावरही विपरीत परिणाम होऊ शकतो.

**राजकीय पक्षावर संकट**

*सदर व्यक्ती एका राजकीय पक्षाशी संबंधित असल्यामुळे या प्रकरणामुळे त्या पक्षावरही संकट येण्याची शक्यता आहे. स्थानिक पातळीवर विरोधक आणि पर्यावरणीय कार्यकर्ते याबाबत आवाज उठवत असून, पक्षावर दबाव निर्माण होऊ शकतो.या सर्व पार्श्वभूमीवर, प्रशासनाने याप्रकरणी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि पर्यावरणीय कार्यकर्त्यांनी केली आहे.*

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. गोविंद बोडके यांनी तातडीने या घटनेची दखल घेतली आहे. प्रशासनाच्या सूचनांनुसार, या प्रकरणात संबंधित राजकीय कार्यकर्त्यावर लवकरच गुन्हा दाखल होणार आहे. पर्यावरणीय कायद्यांचे उल्लंघन करून कांदळवनांची तोड केल्यामुळे, या प्रकरणात कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे.

या राजकीय व्यक्तीने केवळ कांदळवन तोडून अनधिकृत चाळी बांधण्याचे कामच केले नाही, तर सरकारी रस्ता बंद करून स्थानिक रहिवाशांना अडचणीत आणले आहे. यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# वसई-विरार महानगरपालिकेतील अतिरिक्त आयुक्तांवर हल्ला

## कर्मचाऱ्यांकडून निषेध

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयात शुक्रवारी दुपारच्या सुमारास आगरी सेनेच्या काही कार्यकर्त्यांनी विनापरवानगी अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांच्या केबिनमध्ये जबरदस्तीने घुसून त्यांच्यावर हल्ला केला. या आक्रमकांनी अतिरिक्त आयुक्तांना धमकी दिली, शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकीही दिली. यासोबतच त्यांना धक्काबुक्की करण्याचा प्रयत्नही झाला. कार्यालयातील साहित्याची तोडफोड करण्याचाही प्रयत्न करण्यात आला.

या हल्ल्यामुळे महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण पसरले. अतिरिक्त आयुक्तांच्या शेजारी असलेल्या आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांनाही या आक्रमकांनी शिवीगाळ आणि दमदाटी केली, ज्यामुळे कार्यालयात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. या घटनेच्या निषेधार्थ, संध्याकाळी वसई-विरार महानगरपालिकेच्या महासभा सभागृहात एक जाहीर निषेध सभा आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये मा.आयुक्त महोदयांच्या उपस्थितीत महानगरपालिकेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले. या सभेत शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर वारंवार होणाऱ्या धमक्या आणि शिवीगाळीच्या घटनांचा कडक निषेध करण्यात आला. सर्वांनी एकमताने ठरवले की, यापुढे अशा प्रकारच्या घटनांवर कायदेशीर कठोर कारवाई केली जाईल.

निषेधाच्या या सभेत ठरवण्यात आले की सोमवारी सर्व महानगरपालिका कर्मचारी हाताला काळी फित बांधून या घटनेचा निषेध करतील. शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना धमकावणे, शिवीगाळ करणे हे निंदनीय कृत्य असून, यावर कठोर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. पोलीस प्रशासन आणि शासनाकडे यासंबंधी तक्रार दाखल करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी आता या घटनेवर काय कारवाई होते याकडे लक्ष ठेवून आहेत, आणि या हल्ल्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीरपणे विचारात घेतला जाईल अशी अपेक्षा आहे.

# सोपारा खाडीपूलाच्या कामासाठी ठाकरे गट आक्रमक

प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्वेतील सोपारा खाडीपूलाचे अर्धवट काम पूर्ण होईपर्यंत आपल्या प्रयत्नांना थांबवणार नसल्याचे ठाकरे गटाचे परेरानगर शाखाप्रमुख मंगेश चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे. या कामासाठी लवकरच सह्यांची व्यापक मोहीम राबवण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

सोपारा खाडीपूलाच्या पश्चिम बाजूच्या उतारकामावर न्यायालयाने स्थगिती दिली आहे. एका जमीनमालकाच्या याचिकेनुसार, उताराचे काम त्याच्या जागेत येत असल्याचा आक्षेप घेण्यात आला होता. यावर उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे पुलाचे काम अर्धवट राहिले आहे. ठाकरे गटाने यापूर्वी या स्थगितीच्या विरोधात वकीलाची नियुक्ती करून काम सुरू करण्याचे प्रयत्न केले होते, मात्र आता त्यांनी पुन्हा एकदा हा प्रश्न सोडवण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे.

पुलाचे काम अर्धवट असल्यामुळे नायगाव रेल्वे स्टेशनकडे येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या पुलाच्या पायऱ्यांना गंज बसल्यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी असून, ठाकरे गटाचे पदाधिकारी या समस्येला तातडीने सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहेत.लवकरच पुलाच्या कामासाठी सह्यांची भव्य मोहीम राबवून प्रशासनावर दबाव आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंगेश चव्हाण यांनी विश्वास व्यक्त केला आहे की, पुलाच्या कामाला लवकरच सुरुवात होईल आणि या अडचणींवर मात करून सोपारा खाडीपूल पूर्णत्वास नेला जाईल.

# चित्रपट विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी अमोल जाधव

■ मुंबई

महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या उपाध्यक्ष पदी अमोल जाधव यांची शासनाने नियुक्ती केली असून त्यांनी काल पदभार स्वीकारला. यावेळी सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. धनंजय सावळकर यांनी त्यांचे स्वागत केले. दरम्यान जाधव यांनी अधिकारी-कर्मचारी यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी त्यांनी मनोरंजन क्षेत्रात होणारे बदल समजून घेत महामंडळाने



वेगवेगळे उपक्रम राबवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे. नुकतेच केंद्र शासनाने मराठीला अभिजात दर्जा दिला आहे. आपले महामंडळदेखील भाषा,कला, साहित्य चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक क्षेत्राशी निगडीत असल्याने दर्जेदार कार्यक्रम राबविण्यावर आगामी काळात प्रयत्नशील असल्याचेही ते म्हणाले.

# चांदिवली येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याची सुविधा उपलब्ध

**मुंबई:** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून एल विभागातील चांदिवली परिसरातील नागरिकांसाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुविधेचे लोकार्पण स्थानिक आमदार दिलीप लांडे यांच्या हस्ते म्हाडा, चांदिवली येथे सोमवारी करण्यात आले. या सुविधेमुळे चांदिवली परिसरासह म्हाडा वसाहत, संघर्ष नगर येथील नागरिकांना वैद्यकीय सुविधांचा लाभ घेता येणार आहे. येत्या काळामध्ये नागरिकांसाठी याच ठिकाणी प्रसुतिगृह आणि डायलिसिस केंद्राची सुविधादेखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या लोकार्पण सोहळ्यास महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे उप आयुक्त संजय कुऱ्हाडे, स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते. चांदिवलीतील आपला दवाखाना हा मुंबईतील २४४ वा आपला दवाखाना ठरला आहे. येथे सहा मजली इमारतीच्या माध्यमातून वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत. तळ मजल्याच्या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# मूक अलार्मपासून लसीकरणाद्वारे मेनिंजायटीस जागरुकता अभियान

प्रतिनिधी
■ मुंबई

मेनिंजायटीस हा एक गंभीर लस टाळता येण्याजोगा संसर्ग आहे जो विशेषत: लहान मुलांसाठी गंभीर आरोग्यविषयक चिंता निर्माण करतो. जागतिक मेंदुज्वर दिनाचे उद्दिष्ट जागरुकता वाढवणे आणि या रोगाला पराभूत करण्यासाठी जागतिक प्रयत्नांना प्रोत्साहन देणे, लसीकरणाद्वारे लवकर शोधणे आणि प्रतिबंध करण्याच्या जीवन वाचवण्याच्या क्षमतेला चालना देणे. दरवर्षी जागतिक स्तरावर २५ दशलक्षाहून अधिक प्रकरणे नोंदवली जातात, मेनिंजायटीस हे गंभीर आरोग्य संकटाचे प्रतिनिधित्व करते, कारण या आजाराने मरणाऱ्यांपैकी अंदाजे ७०% पाच वर्षांपेक्षा कमी वयाची मुले आहेत. मेनिंजायटीस ही मेंदू आणि पाठीचा कणा (मेनिंजेस) सभोवतालच्या अस्तराची जळजळ आहे आणि सामान्यतः जिवाणू, बुरशीजन्य किंवा विषाणूजन्य संसर्गामुळे होते. मेनिंजायटीस असलेल्या रूग्णांची क्लिनिकल वैशिष्ट्ये कारणे, रोगाचा कोर्स



डॉ. जीतेंद्र गव्हाणे

(तीव्र, उप-तीव्र किंवा जुनाट), मेंदूचा सहभाग (मेनिंगो-एन्सेफलायटीस), आणि पद्धतशीर गुंतागुंत (उदा. सेप्सिस) यावर अवलंबून असतात. मेनिंजायटीसची सामान्य लक्षणे म्हणजे ताठ मान, ताप, गोंधळ किंवा बदललेली मानसिक स्थिती, डोकेदुखी, मळमळ आणि उलट्या. फेफरे, कोमा आणि न्यूरोलॉजिकल कमतरता (उदाहरणार्थ ऐकणे किंवा दृष्टी कमी होणे, संज्ञानात्मक कमजोरी किंवा अंग कमजोरी) ही कमी सामान्य लक्षणे आहेत. मेनिंजायटीसमुळे सर्वाधिक मृत्यू होणाऱ्या तीन देशांमध्ये भारताचा समावेश होतो.

तीव्र जिवाणू मेनिंजायटीस कारणीभूत असलेल्या तीन रोगजनकांपैकी, निसेरिया मेनिन्जाइटिस उपचार असूनही १५% पर्यंत आणि उपचार न केल्यास 50% पर्यंत उच्च मृत्यू दरासाठी जबाबदार आहे. २ वर्षांपेक्षा कमी वयाच्या भारतीय मुलांमध्ये तीव्र जिवाणूजन्य मेंदुज्वर होणाऱ्या निसेरिया मेनिन्जायटीसच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे अभ्यासांनी दर्शविले आहे. एमजीएम मेडिकल कॉलेज नवी मुंबईचे बालरोगशास्त्राचे प्राध्यापक डॉ. जीतेंद्र गव्हाणे म्हणाले "लसीकरण हा मेनिंजायटीसचा संसर्ग रोखण्याचा एक आधारस्तंभ आहे," "गर्दीच्या वातावरणात राहणाऱ्या रोगप्रतिकारक-तडजोड व्यक्ती आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि उद्रेक होण्याचा धोका कमी करण्यासाठी लसीकरणास प्राधान्य दिले पाहिजे." या प्राणघातक रोगाचा सामना करण्यासाठी, इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स (IAP) ने मेनिन्गोकोकल लसीची शिफारस केली आहे

**महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, ठाणे**

email: cwdzp१६९.thane@gmail.com | दूरध्वनी क्रमांक - ०२२-२५३६९१२२
ISO ९००१:२०००
**कार्यालयाचा पत्ता:-** स्क्वेअर फिट होम्स २ रा मजला प्लॉट नं १०७/१०६. एसबवे . जी. २२, वागळे इस्टेट, टी भवन समोर. एस. जी, रोडनं सर्कल (पश्चिम) ठाणे - ४००६०४

जाहिर ई-निविदा

**कामाचा तपशील:-** सन २०२४- २५ या वित्तीय वर्षात आदिवासी उपयोजनेअंतर्गत अंगणवाडीतील कुपोषित बालके, | कमी वजनाची बालके यांनामल्टी मिलेट न्युट्रीशनल बिस्कीट पुरविणे.


ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रामध्ये सन २०२४ - २५ या वित्तीय वर्षात आदिवासी उपयोजनेअंतर्गत अंगणवाडीतील कुपोषित बालके, कमी वजनाची बालके यांना मल्टी मिलेट न्यूट्रीशनल बिस्कीट पुरविणे हे खालील साहित्य खरेदी करिता ऑनलाईन निविदेद्वारे (दोन लिफाफा) पद्धतीने निविदा मागवीत आहोत.

| अ.क्र | तपशील | अंदाजित लाभार्थी | निविदा शुल्क फी | बयाना रक्कम | तपासणी फी रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | आदिवासी उपयोजनेअंतर्गत अंगणवाडीतील कुपोषित बालके, कमी वजनाची बालके यांना मल्टी मिलेट न्युट्रीशनल बिस्कीट पुरविणे. | ८६७८ | १९०००/- + १८% GST ३४२०/- एकूण रू. २२४२०/- | ३,४५,८००/- | १५,०००/- |

सही/-
जिल्हा कार्यक्रम अधिकारी
महिला व बाल विकास
जिल्हा परिषद ठाणे

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे

जा.क्र.ठाजिप/मबाविवि/योजना /९२/२०२४-२५
दिनांक : ८/१०/२०२४




Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 112
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ११२
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## पालिका कामगार नेते दिवाकर दळवी इंटकच्या कोषाध्यक्षपदी

मुंबई : जेष्ठ विज्ञाननिष्ठ पालिका कामगार नेते दिवाकर दळवी ,यांची राष्ट्रीय मजदूर कॉंग्रेस ( इंटक) महाराष्ट्र राज्याच्या कोषाध्यक्षपदी निवड झाली आहे. दळवी हे गेली 50 वर्ष कामगार, सामाजिक, राजकीय,सहकार ,शिक्षण , साहित्य,नाट्य इत्यादि क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांची राष्ट्रीय मजदूर कॉंग्रेस ( इंटक ) महाराष्ट्र राज्याच्या कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मुकेश तिगोटे,.गंगाराम गावडे, दत्तात्रय गुट्टे,.अमित भटनागर,सुनिल गुप्ते, प्रकाश सोनावणे*विशाल जाधव, दिनेश कांबळे आणि रमेश जाधव. यांनी अभिनंदन केले आहे.



# कोणत्याच नेत्याने मुख्यमंत्रीपदावर दावा करू नये!

## उद्धव ठाकरेंची मागणी वडेट्टीवारांनी पुन्हा फेटाळली

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाविकास आघाडीतील कोणत्याही नेत्याने मुख्यमंत्रीपदावर दावा करू नये, असे म्हणत विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी उद्धव ठाकरे यांची मागणी पुन्हा एकदा फेटाळली आहे. याबरोबरच त्यांनी त्यांच्या कॉंग्रेस पक्षातील नेत्यांचे देखील कान टोचले आहे. मुख्यमंत्री पदाच्या निवडणुकीला अजून वेळ आहे. आधी विधानसभा निवडणुका होतील, त्यानंतर मुख्यमंत्री निवडायची वेळ येईल. त्यावेळी या विषयावर चर्चा करता येईल. मात्र, आता महायुतीला सत्तेतून बाजूला सारणे महत्त्वाचे असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

हरियाणा मध्ये कॉंग्रेसच्या बाजूने एकतर्फी जनमत असल्याचे सर्वांनी पाहिले होते. मात्र, नंतरच्या काळात झालेल्या घटना घडामोडीनंतर महाराष्ट्राला बरेच काही शिकायला मिळाले आहे. मुख्यमंत्री पदाची आकांक्षा कोणत्याही नेत्यात नसावी, आमच्यात देखील हा विषय नसल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. या माध्यमातून त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह पक्षातील इतर नेत्यांचे देखील कान टोचले असल्याचे बोलले जात आहे.

दोनच दिवसापूर्वी उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याबाबत पुन्हा एकदा भाष्य केले होते. महाराष्ट्रातील मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर व्हावा, अशी आमची मागणी होती, असे संजय राऊत यांनी म्हटले होते. त्यामुळे पुन्हा एकदा महाआघाडीत मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्या बाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाच्या चेहरा घोषित करावा, अशी मागणी कॉंग्रेसकडे केली होती. मात्र, कॉंग्रेस पक्षासह शरदचंद्र पवार पक्षाने देखील ही मागणी फेटाळून लावली होती. विधानसभा निवडणुकीनंतर याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे कॉंग्रेस आणि शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे.





### *ज्याचे जास्त आमदार त्यांचाच मुख्यमंत्री*

*ज्या पक्षाचे जास्त आमदार निवडून येतील, त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल, असा फॉर्मुला शरद पवार यांनी सांगितला होता. मात्र हा फॉर्मुला मान्य करायला उद्धव ठाकरे तयार नसल्याचे बोलले जात आहे. हाच फॉर्मुला महायुतीमधील नेत्यांनी देखील बोलून दाखवला आहे. सध्या भारतीय जनता पक्षाचे सर्वाधिक आमदार असून देखील एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री आहेत. मात्र, आगामी विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. तर दुसरीकडे कॉंग्रेसच्या वतीने देखील असाच प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे.*

# रेल्वे करणार महाराष्ट्रात 1,64,605 कोटींचे विविध रेल्वे प्रकल्प

**प्रतिनिधी**
**मुंबई**

केंद्राच्या २०२४-२५ च्या रेल्वे अर्थसंकल्पात, महाराष्ट्राला रु. १५,९४० कोटींचे विक्रमी वाटप झाले आहे. जे २००९-१४ या कालावधीतील सरासरी रु. १,१७१ कोटींच्या वाटपाच्या १३.५ पट आहे. त्यामुळे विविध प्रकल्पांचे नियोजन/मंजुरी देण्यात आली आहे आणि अनेक प्रकल्पांवर काम सुरू आहे ज्यामुळे महाराष्ट्रातील वाहतूक नेटवर्कचा चेहरा मोहरा बदलेल आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. अशी आशा रेल्वे प्रशासनाने व्यक्त केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणलेला एक दूरदर्शी उपक्रम, ही परिवर्तनकारी योजना देशभरातील १३३७ रेल्वे स्थानकांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी, ट्रॅव्हल हबमध्ये नवीन जीवन श्वास घेण्यासाठी आणि एकूण प्रवाशांचा अनुभव वाढवण्यासाठी सज्ज आहे. अमृत भारत स्थानक योजनेत दीर्घकालीन दृष्टीकोनातून स्थानकांचा सतत विकास केला जातो. यामध्ये स्थानकांची सुधारणा, वेटिंग हॉल, टॉयलेट्स, लिफ्ट्स, एस्केलेटर, वन स्टेशन वन प्रोडक्ट स्टॉल्स, एक्झिक्युटिव्ह लाउंज, मल्टी मॉडेल इंटिग्रेशन इत्यादीसारख्या चांगल्या सुविधांचा समावेश आहे. परळ, जालना, पंढरपूर, इगतपुरी, नाशिक रोड, ग्रँट रोड, इतवारी इत्यादी स्थानकांसह एकूण ६,४११ कोटी रुपये खर्चून संपूर्ण महाराष्ट्रात १३२ स्थानकांच्या कायापालटाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

रखवालदार असलेले लेव्हल क्रॉसिंग गेट्स काढून टाकण्यासाठी रोड ओव्हर ब्रिज (ROBs)/ रोड अंडर ब्रिजेस (RUBs) चे बांधकाम हाती घेण्यात आले आहे, अशा प्रकारे ट्रेन ऑपरेशन्समध्ये सुरक्षितता, गाड्यांची गतिशीलता आणि रस्ते वापरकर्त्यांसाठी परिणाम आणि व्यवहार्यता इ. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात ३१८ रोड ओव्हर ब्रिज (ROBs)/रोड अंडर ब्रिजेस (RUBs) बांधण्याचे काम एकूण रु. ५,६१५ कोटी खर्चून प्रगतीपथावर आहे.यामध्ये निफाड, दिवा, फुलगाव, नगरगाव, कल्याण, पनवेल आदी ठिकाणी सुरू असलेल्या कामांचा समावेश आहे.




### *राज्यातील सुरू असलेले प्रकल्प*

*एकूण रु. ८१,५८० कोटी किमतीचे ५,८७७ किलोमीटर लांबीचे एकूण ४१ सुरू प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्रात विविध ठिकाणी प्रगतीपथावर आहेत. या प्रकल्पांमध्ये नवीन रेल्वे लाईन्सचे बांधकाम, रेल्वे लाईन्स जोडणे आणि वाढवणे, रेल्वे लाईनचे दुहेरीकरण आणि गेज रूपांतरण, विद्युतीकरणाचे काम इत्यादींचा समावेश आहे.*

# म्हाडा कोंकण मंडळातर्फे 12,626 सदनिकांच्या विक्रीसाठी अर्ज नोंदणी व भरणा प्रक्रियेला प्रारंभ

## उपाध्यक्ष संजीव जयस्वालांच्या हस्ते सोडतीचा 'गो-लाइव्ह' समारंभ



**प्रतिनिधी**
**मुंबई**

म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, कल्याण, टीटवाळा, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग मधील ओरस आणि वेंगुर्ला आणि मालवण येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत १२,६२६ सदनिकांच्या विक्रीकरिता अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ सोडतीचा 'गो-लाइव्ह' कार्यक्रमांतर्गत म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते आज करण्यात आला.

म्हाडा मुख्यालयात आयोजित 'गो-लाइव्ह' कार्यक्रमांतर्गत संजीव जयस्वाल यांनी सांगितले की, नुकत्याच मुंबईतील पार पाडलेल्या सोडतीनंतर आज म्हाडाच्या कोंकण मंडळातर्फे १२,६२६ सदनिकांची सोडत जाहीर करण्यात येत आहे. मुंबईच्या शेजारील ठाणे, कल्याण, नवी मुंबई आणि विरार या शहरांमध्ये परवडणार्याच दरातील सदनिकांचा या सोडतीत प्रामुख्याने समावेश आहे.

समाजातील शेवटच्या घटकाला हक्काचा निवारा मिळावा या उद्दिष्टांवर कार्यरत म्हाडाने कोंकण मंडळाच्या सोडतीच्या माध्यमातून १०४२८ घरे अत्यल्प उत्पन्न गटासाठी तर १९८१ घरे अल्प उत्पन्न गटासाठी तर मध्यम उत्पन्न गटासाठी ८५ सदनिका, उच्च उत्पन्न गटासाठी १३२ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध केली आहेत. अधिकाधिक नागरिकांनी आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या सोडत प्रक्रियेत सहभाग घ्यावा. असे जयस्वाल यांनी सांगितले व कोंकण मंडळाच्या सोडत प्रक्रियेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना शुभेच्छा दिल्या. म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सोडत प्रक्रियेत म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in व https://lottery.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरूनच अर्ज नोंदणी, अर्ज भरणा करून सहभाग नोंदवायचा आहे.

# सिनेअभिनेते सोनू सूद यांच्याहस्ते वर्सोवा येथील 'श्री स्वामी समर्थ सर्कलचे' उदघाटन

**प्रतिनिधी**
**मुंबई**

वर्सोवा विधानसभेच्या भाजप आमदार डॉ. भारती लव्हेकर यांच्या संकल्पनेतून आणि डीपीडीसी फंडातून श्री स्वामी समर्थ सर्कल, लोखंडवाला परिसराचं सुशोभिकरण करण्यात आले. या सर्कल चे उद्घाटन सिने अभिनेते सोनू सुद यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी आमदार डॉ. भारती लव्हेकर, माजी नगरसेवक योगीराज दाभाडकर (वॉर्ड ६०) आणि माजी नगरसेविका रंजना पाटील (वॉर्ड ६३) उपस्थित होते.

वर्सोवा येथील लोखंडवाला मार्केट हे आधीपासूनच एक प्रसिद्ध लँडमार्क आहे आणि आता या परिसराची शोभा आणखी वाढणार आहे कारण अनेकांचे श्रद्धास्थान असलेल्या लोखंडवाला येथील 'श्री स्वामी समर्थ मठा'जवळ असलेल्या सर्कलमध्ये आकर्षक रंगीबेरंगी विद्युत रोषणाई केलेले कारंजे उभारण्यात आले आहे. या सर्कलच्या सुशोभीकरणामुळे येथील श्री स्वामी समर्थ मठाच्या परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

आमदार डॉ. भारती लव्हेकर म्हणाल्या की, "लोखंडवाला मार्केट आधीच एक लक्षवेधक लँडमार्क आहे, परंतु त्याच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी कामे हाती घेण्यात आली.





## पश्चिम रेल्वे
### देखभाल कामे

विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेन्ट्रल मुंबई ४०००08 हे ई-निविदा सूचना क्र.: बीसीटी/२४-२५/१८९, दिनांक: १०.१०.२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: विरार-जोरावसन अनुभाग- वरी. डीईएन/उत्तर/ एमएमसीटी अनुभागा अंतर्गत एलएचएस काढणे आणि ट्रॅक देखभाल कामाच्या दरम्यान डब्ल्यू क्रश बॅरीयर बाबीचे परत बसविणे, सेस रुंदीकरण काम आणि आगामी काम. कामाचे अंदाजे मूल्य: रु. १,९५,६२,३८२. इरठे: २,४७,८००/= सादरीकरण दिनांक आणि वेळ : ०५.११.२०२४ रोजी १५.०० वा. उघडण्याचा दिनांक आणि वेळ : ०५.११.२०२४ रोजी १५.३० वा. तपशीलासाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.
0622
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### विभाग : मुख्य अभियंता (यांत्रिकी आणि विद्युत)
### ई-निविदा सूचना

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्र क्र | बोली क्र.:२०२४_एमसीजीएम_१११४१५२_१ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | महात्मा गांधी मेमोरियल स्विमिंग पूल, दादर (प) येथे किरकोळ कामे. |
| छाननी शुल्क | रु. ३३००/- + १८.०% जीएसटी |
| ई-निविदेचे मूल्य (अंदाजे मूल्य) | नग दर निविदा |
| बोली सुरक्षा ठेव/ ईरठे | रु. १४,५००/- |
| निविदा जारी आणि विक्रीचा दिनांक | १२.१०.२०२४ रोजी ११:०० वा. पासून |
| निविदा विक्रीसाठी आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृतीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ | १८.१०.२०२४ रोजी १२:०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए,बी आणि लिफाफा सी चे सादरीकरण (ऑनलाईन) | १८.१०.२०२४ रोजी १६:०० वा. पर्यंत |
| पूर्व बोली बैठक | लागू नाही |
| लिफाफा ए उघडणे | २१.१०.२०२४ रोजी १६:०१ वा./नंतर |
| लिफाफा बी उघडणे | २१.१०.२०२४ रोजी १६:०२ वा./नंतर |
| पत्रव्यवहारासाठी पत्ता | यांचे कार्यालय:- कार्य.अभि.यांत्रिकी(ई.आय) देखभाल., बृमनपा, महापालिका कार्यशाळा, आर. एस. निमकर मार्ग, भायकळा, मुंबई- ४०० ००८ |
| बोली उघडण्यासाठी ठिकाण | कार्य.अभि.यांत्रिकी (ई.आय) देखभाल. यांच्या कार्यालयात ऑनलाईन |
| एनआयसी पोर्टल | http://mahatenders.gov.in |

निविदा कागदपत्रे हस्तांतरित करता येणार नाही.
बृमनपा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी वरील निविदेसाठी कोणताही अर्ज स्वीकारण्याचे किंवा स्वीकारलेले कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

पीआरओ/१७६८/जाही/२०२४-२५

सही/-
कार्य. अभि. यांत्रिकी (ई.आय) देखभाल

कोणताही ताप असू शकतो हिवताप.



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### (जल अभियंता विभाग)

बृहन्मुंबई महानगरपालिका चे आयुक्त खाली तपशिलामध्ये देण्यात आलेल्या कामासाठी तीन लिफाफा पद्धतीमध्ये शतमान तत्वावर ह्याच क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या संस्थांकडून ऑन लाईन निविदा मागवित आहेत.

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्र क्र. | २०२४_एमसीजीएम_१११०२५८ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | ए. ई. (देखभाल) डब्ल्यू. डब्ल्यू. शहर II विभागाच्या अंतर्गत कमला नेहरू पार्क येथे लॉन्स चे प्लांटेशन |
| निविदेचे छाननी शुल्क | रु १५५७६/- (रु. १३२००/- + १८% जीएसटी) |
| ई-निविदा मूल्य (अंदाजे मूल्य) | रु. ५७६६१३०.०० |
| बोली सुरक्षा ठेव/ ईरठे | रु. ५८०००/- (ऑन लाईन) |
| निविदेच्या वितरण आणि विक्रीचा दिनांक अनिव वेळ | १२/१०/२०२४ रोजी ११.०० वा. पासून |
| निविदेच्या विक्रीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृती | २६/१०/२०२४ रोजी १२:०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए, बी आणि सी चे सादरीकरण (ऑन लाईन) | २६/१०/२०२४ रोजी १६:०० वा. |
| लिफाफा ए उघडणे | २८/१०/२०२४ रोजी १२:०५ वा. |
| लिफाफा बी उघडणे | ३१/१०/२०२४ रोजी १२:१० वा. नंतर |
| लिफाफा सी उघडणे | ११/११/२०२४ रोजी १५:०० वा. नंतर |
| संकेतस्थळ | http://portal.mahatender.gov.in |
| संपर्क व्यक्ती | 1. श्री. आर हेंद्रे (एएसजी) ८१०८४९१०६०<br>2. श्री. पी. टी. शिंदे (एई) ९९३०२६०५०९ |
| पत्राव्यवहारासाठी पत्ता | कार्यकारी अभियंता (देखभाल) ह्यांचे कार्यालय: मीटर कार्यशाळा, बीएमसी, ५६६, एन. एम. जोशी रोड, एस ब्रिज जवळ, भायखळा (प) मुंबई ४०००११ |
| बोली उघडण्याचे ठिकाण: | कार्यकारी अभियंता (देखभाल) ह्यांचे कार्यालय: मीटर कार्यशाळा, बीएमसी, ५६६, एन. एम. जोशी रोड, एस ब्रिज जवळ, भायखळा (प) मुंबई ४०००११ येथे ऑनलाईन |

निविदा कागदपत्रे हस्तांतरीत करता येणार नाहीत. बृमनपा कोणतेही कारण न देता वरील विषयासाठी कोणताही अर्ज स्वीकारण्याचे किंवा स्वीकारलेला कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

पीआरओ/१७२२/जाही/२०२४-२५

सही/-
उप जल अभियंता
(देखभाल)

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
### (म्हाडाचा घटक)
म्हाडा MHADA

### निविदा सूचना क्र. ३० (२०२४-२५)

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी.एम.सी.फ दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई - ४०००१२. यांचेकडे म्हाडा / सिडको/पी.डब्ल्यू.डी/सी. पी. डब्ल्यू. डी / एम.आय.डी.सी./बी.पी.टी./एम. ई. एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी-१फॉर्ममध्ये [ टक्केवारी दर] सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे

| अ. क्र | कामाचे नांव | निविदा रक्कम | १% इसारा रक्कम | २% सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम (विना परतावा रु.१८% GST सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १ | उपकरप्राप्त इमारत क्र. २३, जिवाजी भवन, गोखले सोसायटी लेन, परळ मुंबई या इमारतीचे दुरस्ती काम करणे [ मंडळ निधीचे काम ] | ८,४७,८३७/- | ८,४७८.०० | १७,०००.०० | ५९०.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. २३/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि.२४/१०/२०२४ ते दि. २५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |

1 जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रककम ०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम 'देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2 कोऱ्या निविदा म्हाडा / मु.म.पा./ सा.बां. विभाग/ के.सा.बां. वि/रिल्वे /बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्याए पैन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
3 म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सदर करावे.
5. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ. बु. व पु. मंडळ यांच्या नावावर दयानी.
6. को ऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ[द] विभाग, फ[द] विभाग तिसरा मजलाए अॅनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई - १२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो दि. २५/१०/२०२४ रोजी दुपारी ३. ०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ. दु. व पु. मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
8. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामाचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता (सिव्हिल इंजिनियर आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
9. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
10. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे.
11. मागविण्यात आलेली निविदा सन २०२२-२३ च्या एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अवागयी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल 12. जी. एस. टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

CPRO/A/985

Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता फ [द] विभाग
मुं.इ.दु. व. पु. मंडळ

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### वृक्ष प्राधिकरण
### जाहीर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (०१ जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३ ) (क) मधील तरतूदी नुसार परिमंडळ - ३ मधील एच / प विभागातील ०२ प्रस्ताव हे मा. म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, / वृक्ष प्राधिकरण समिती यांच्याकडे झाडे काढण्यासाठी परवानगी मिळावी याकरीता प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनर्रोपित करणेबाबतचे तपशील हे महानगरपालिकेच्या https://mcgm.gov.in या संकेतस्थळावर बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते --> खातेनिहाय माहिती पुस्तिका --> उद्याने व वृक्ष प्राधिकरण - कागदपत्रे --> वृक्ष प्राधिकरण जाहिर सूचना ७ दिवस ३४२> Zone- III या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रस्तावांविषयी नागरीकांच्या काही आक्षेप वा सूचना आसल्यास सदर जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात विहित नमुन्यात (Prescribed Format) उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालशत सादर कराव्यात, तसेच आपण आपल्या आक्षेप / सुचना विहित नमून्यात (Prescribed Format) dysg.ta@mcgm.gov.in या ई-मेलवरीही नोंदवू शकतात.

नोंद विहित मुदतीत सादर न झालेले आक्षेप / सुचनेचा विचार करता येणार नाही. याची कृपया घ्यावी. लेखी / ई- मेलद्वारे सुचना / आक्षेप पाठवुनही अति आवश्यक असल्यास आपण या सुचना / आक्षेपांच्या लेखी / ई-मेलच्या प्रतीसह व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहू शकता, सदर सुचना / आक्षेपाबाबतची सुनावणी दि२३ / १० / २०२४ रोजी उद्यान अधिक्षक कार्यालयात दुपारी ४.३० ते ०५.०० वाजेदरम्यान करण्यात येईल.

**उद्यान अधिक्षक यांचे कार्यालय,**
उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय,
वीरमाता जिजाबाई भोसले उदयान व प्राणिसंग्रहालय,
२ रा मजला, इम्बोल्ट पेग्विन कक्ष
संत सावता माळी मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई- ४०००२७.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२ Email - dysg.ta@mcgm.gov.in

पीआरओ/१६९६/जाही/२०२४-२५

सही/-
उद्यान अधीक्षक
व वृक्ष अधिकारी

झाडे लावा, झाडे जगवा

जेव्हा तुम्ही स्वप्नाने सुरुवात करता आणि उत्कटतेने काम करता तेव्हा यश अपरिहार्य असते.



- रतन टाटा
प्रसिद्ध उद्योगपती


वृत्तमानस

मुंबई, शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४


# अधिकारांचे सिमोल्लंघन होऊ द्या

महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कामे करतात, असे म्हटले जात असले तरी देशातील कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या महिलांची संख्या पुरुषांच्या तुलनेत अतिशय कमी असल्याचे स्पष्ट होते. एकीकडे स्त्री पुरुष समानतेच्या गप्पा मारताना ही विसंगती मात्र कायम दुर्लक्षित केली जाते हे वास्तव. केवळ काम करण्याची संख्या नव्हे तर पुरुषांच्या तुलनेत महिलांचा पगार कमी असतो. जेव्हा अधिकार, संधी, पगार, लाभ आणि सहभागाच्या आधारावर महिला आणि पुरुषांना भिन्न वागणूक दिली जाते तेव्हा लिंगभेद दिसून येतो. यामध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने २०२३ च्या ग्लोबल जेंडर गॅप निर्देशांकात भारताला १४६ देशांपैकी १२७ व्या क्रमांकाचे स्थान दिले आहे. जागतिक असमानता अहवाल २०२२ नुसार, भारतातील श्रमिक उत्पन्नाच्या ८२ टक्के पुरुष कमवतात तर महिला फक्त १८% कमवतात. कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुद्धा खूप तफावत आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांना बढती मिळण्याचं प्रमाण कमी आहे. साक्षरता दर वाढूनही महिलांचा कामातील सहभाग कमी आहे. भारतातील नोकरदार महिलांची संख्या २०१९ मध्ये २० टक्क्यांनी वाढली; परंतु २०२० मध्ये ती १८ टक्क्यांवर आली. त्यामुळे भारतीय कर्मचाऱ्यांमधली महिला आणि पुरुष यांच्यामधली दरी रुंदावत गेली आहे. भारतीय कंपन्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व २०१६ मध्ये केवळ २५ टक्के होते. ते २०१९ मध्ये ३३ टक्क्यांवर पोहोचले. नंतर कोरोना संकटाच्या काळात महिला कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व वाढण्याचा वेग मंदावला. भारतीय कंपन्यांतील महिलांचे प्रतिनिधित्व २०२० मध्ये ३४ टक्के झाले. ते २०२१ मध्ये ३४.५ टक्के आणि २०२२ मध्ये ३४.८ टक्क्यांवर पोहोचले. कोरोना संकटाच्या काळात आणि त्यानंतर महिलांचे प्रतिनिधित्व फारसे वाढलेले नाही. वाढीचा मंदावलेला वेग अजूनही कायम असून, गेल्या दोन वर्षातही त्यात मोठी वाढ झालेली दिसून आलेली नाही. कंपन्यांतील महिलांची संख्या वाढविण्याबाबत पावले उचलण्याची मागणीही सातत्याने केली जाते. कंपन्यांत उच्चपदस्थ ठिकाणी महिलांनी संधी द्यावी, अशी आग्रही भूमिका घेतली जाते. अलीकडेच याबाबत जाहीर झालेल्या एका अहवालानुसार, या वर्षी भारतीय कंपन्यांतील महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण ३६.६ टक्के आहे. गेल्या दोन वर्षांत त्यात फारशी वाढ झालेली नाही. गेल्या वर्षी हे प्रमाण ३६.९ टक्के होते. एका अहवालानुसार पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण निर्मिती क्षेत्रात सर्वांत कमी आहे. या क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व केवळ २० टक्के आहे. व्यावसायिक सेवा क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व सर्वाधिक ४६ टक्के आहे. भारतीय कंपन्यांमध्ये प्राथमिक टप्प्यांवरील जबाबदाऱ्यांत महिलांचे प्रतिनिधित्व सुमारे ४० टक्के आहे. याच वेळी उच्चपदस्थ व्यवस्थापकीय जबाबदाऱ्यांमध्ये हे प्रमाण केवळ २८.४ टक्के आहे. बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्रात उच्चपदस्थ पदांवरील महिलांचे प्रमाण २४.५ टक्के असून, त्याखालोखाल एफएमसीजी क्षेत्रात २१.५ टक्के आहे. एका अभ्यासानुसार, काम करणारी व्यक्त स्त्री आहे म्हणून तिला फारसं कामं जमणार नाही, असे कायम गृहीत धरले जाते. त्यामुळे आजही काही कंपन्यांमध्ये महिलांचा 'पे रोल' हा पुरुषांपेक्षा कमी असतो. अनेकदा स्त्रिया पुरुषांइतका ओव्हरटाइम करू शकत नाहीत, त्यांना घरच्या जबाबदाऱ्या असतात, असं सांगत त्यांची पगारवाढ कमी केली जाते. व्यवस्थापक म्हणून पदोन्नती झालेल्या प्रत्येक १०० पुरुषांमागे केवळ ८६ महिला समान दर्जा मिळवितात. महिला कर्मचाऱ्यांसाठी उत्कृष्ट असलेल्या कंपन्यांत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची संख्या जास्त आहे. महिलांसाठी उत्कृष्ट असलेल्या एकूण कंपन्यांपैकी २४ टक्के कंपन्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आहेत. त्याखालोखाल बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्रातील कंपन्यांचे ११ टक्के प्रमाण आहे. उत्पादन आणि जागतिक सुविधा केंद्र क्षेत्रातील कंपन्यांचे प्रमाण प्रत्येकी ९ टक्के आहे. विशेष म्हणजे, महिलांना काम करण्यासाठी उत्कृष्ट असलेल्या कंपन्यांपैकी ६३ टक्के बहुराष्ट्रीय कंपन्या असल्याचे स्पष्ट झाले आहे. महिलांना काम करण्यासाठी उत्कृष्ट ठरलेल्या कंपन्यांमध्ये ॲक्सेंचर सोल्यूशन्स, एएक्सए एक्सएल इंडिया बिझनेस सर्व्हिसेस, बार्कलेज इंडिया, केर्न ऑईल अँड गॅस, सिटीबँक, आयबीएम इंडिया, केपीएमजी इंडिया, लियर कॉर्पोरेशन, टेक महिंद्रा या कंपन्यांचा समावेश आहे. याचबरोबर सर्वसमावेशकतेच्या बाबतीत ॲक्सेंचर सोल्यूशन्स, एक्सए एक्सएल इंडिया बिझनेस सर्व्हिसेस, सिटीबँक, आयबीएम इंडिया, इन्फोसिस, केपीएमजी इंडिया, मिडलँड क्रेडिट मॅनेजमेंट, टार्गेट कॉर्पोरेशन आणि टेक महिंद्रा या कंपन्यांचा समावेश आहे. तरीही महिलांचा सहभाग म्हणावा तेवढा अजूनही वाढलेला नाही हे महत्वाचे. महिलांचा काम करण्याचा सहभाग वाढावा यासाठी सरकार आणि काही कंपन्या प्रयत्न करत असल्या तरी त्याला अपेक्षित यश येताना दिसत नाही. एकूण कंपन्यांपैकी ५८ टक्के कंपन्या २०१९ मध्ये अपंग कर्मचाऱ्यांसाठी पूरक व्यवस्थेचा विचार करीत होत्या. ही संख्या वाढून आता ९८ वर पोहोचली आहे. आता अधिकाधिक कंपन्या सर्वसमावेशक वातावरणावर भर देताना दिसत आहेत. लिंग, अपंगत्व, वय, संस्कती यातील भिन्न घटकांना योग्य वातावरण निर्मिती करण्यावर कंपन्या भर देत आहेत. यामुळे भारतीय कंपन्या अधिकाधिक सर्वसमावेशक होत असल्याचे अहवालातून अधोरेखित करण्यात आले आहे. कायद्यानुसार पुरुष आणि स्त्रिया दोघांसाठी समान कामासाठी समान वेतनाची हमी देण्यात आली आहे. पण ती केवळ कागदावरच दिसते. ९५ देशांनी समान वेतनाबाबत कायदे केले; तर केवळ ३५ देशांनी वेतनातील तफावत भरून काढण्यासाठी उपाययोजना केल्या होत्या. स्त्रिया दिवसाला सरासरी २.३ तास पुरुषांच्या तुलनेत बिनपगारी कामात अधिक वेळ घालवतात. महिलांना अनेक गोष्टींमधून जावे लागते जसे की, बाळतंपण, मुलांचं संगोपन आदींची त्यांच्यावर खूप मोठी जबाबदारी असते. घरचे कितीही समजूतदार असले तरी एका काळापर्यंत बाळाला आपली आईच सातत्याने सोबत लागते. या बाबीचाही परिणाम स्त्रीच्या करिअरवर होतो. महिलांसाठी आणखी एक अडथळा म्हणजे कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ, बालविवाह व स्त्रीहत्या याविरुद्ध मिळणारे कायदेशीर संरक्षण. अर्थव्यवस्थांमध्ये कामाच्या ठिकाणी लैंगिक छळावर बंदी घालणारे कायदे असले तरी अनेकदा महिला याला बळी पडतात. एप्रिल २०२० ते एप्रिल २०२३ या कालावधीत २७% पुरुषांच्या तुलनेत ३७% महिलांनी नोकऱ्या गमावल्या. तसेच नोकरदार ग्रामीण महिलांच्या संख्येत मोठी घसरण झाली आहे. जानेवारी २०२२ मध्येदेखील महिलांच्या श्रमशक्तीचा सहभाग जानेवारीच्या तुलनेत ९.४% कमी होता. साथीच्या रोगानंतर तंत्रज्ञान, आरोग्य सेवा आणि वित्तीय सेवा क्षेत्रात स्त्री-पुरुष वेतनातही असमानता वाढली. नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिसच्या सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, वेतनातील तफावत कमी करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न केले जात असले तरी भारतातील महिला अजूनही पुरुषांपेक्षा कमी कमावतात. जगभरातील पुरुषांपेक्षा महिलांची कमाई २० टक्क्यांनी कमी आहे. त्यामुळे पगारातील हा फरक महिलांच्या आर्थिक स्थिरता आणि आर्थिक स्वातंत्र्यावर परिणाम करू शकतो. पुरुषांच्या तुलनेत महिलांना समान वेतन दिलं पाहिजे. कामकाजाची लवचिक व्यवस्था, महिलांसाठी प्रशिक्षण आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून देऊन या समस्येचं निराकरण केलं गेलं पाहिजे. सरकार महिलांसाठी रोजगार निर्माण करू शकते. लघु, मध्यम उद्योगांमध्ये त्यांची भूमिका वाढवू शकते आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊ शकते. नेतृत्वाच्या भूमिकेसाठी त्यांना विकसित करणं उच्च पदावरील लिंगभेद भरून काढू शकते. कामाच्या ठिकाणी मिळणारी दुय्यम वागणूक हे वास्तव नक्कीच एक समाज म्हणून विचार करायला भाग पाडणारे आहे. समानता ही केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात सर्व पातळयांवर आली तरच महिलांना न्याय मिळाला असे म्हणता येईल.

# पत्रकारांसाठी महामंडळ हा फक्त 'निवडणूक जुमला'

**एस. एम. देशमुख**

पत्रकार संरक्षण कायद्याचं नोटीफिकेशन काढून राज्यात पत्रकार संरक्षण कायदा लागू करण्यास टाळाटाळ केली जात आहे. पत्रकार पेंशन योजनेसाठी अनेक ज्येष्ठ पत्रकारांचे अर्ज तांत्रिक दोष काढून हेतूत: प्रलंबित ठेवले जात आहेत. पेंशनची रक्कम 11, 000 वरून 20, 000 करण्याची घोषणा तर केली गेली मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही. मजेठिया वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केली जात आहे. अधिस्विकृती पत्रिका धारकाच्या रेल्वेसह अनेक सवलती रद्द केल्या गेल्या आहेत.

साप्ताहिके आणि छोटी दैनिके बंद पडतील असं वृत्तपत्र धोरण आखलं जात आहे. चांगल्या युट्यूब चॅनल्सना सरकारी जाहिराती सुरू करा, त्यांना अधिस्विकृती द्या, या मागण्यांकडे दुर्लक्ष केलं जात आहे. या सर्व बुनियादी प्रश्नांची उपेक्षा करून सरकार आता पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करायला निघालं आहे. हा केवळ 'निवडणूक जुमला' आहे, प्रत्यक्षात होणार काही नाही. याचं कारण पत्रकारांचे प्रश्न सुटले पाहिजेत, असं सरकारला मुळी वाटतंच नाही. महामंडळ स्थापन करून पत्रकारांचे प्रश्न सुटतील असं आम्हाला वाटत नाही. विविध क्षेत्रातील लोकांसाठी अगोदरच राज्यात 55 महामंडळं आहेत, या महामंडळाची काय अवस्था आहे आणि त्यातून किती लोकांचे कोटकल्याण झाले म्हणून महामंडळाने पत्रकारांचे होणार आहे? "पांढरे हत्ती" अशीच या सर्व महामंडळांची ओळख आहे. 'गोदी मिडिया'तील काही लोकांची सोय करणे एवढाच या घोषणेचा अर्थ असू शकतो. कोणी केली होती ही मागणी? राज्यातील कोणत्याही प्रमुख पत्रकार संघटनेने ही मागणी केलेली नाही किंवा कोणत्याही प्रमुख पत्रकार संघटनेशी सरकारने यासंदर्भात चर्चा, विचारविनिमय केलेला नाही. त्यामुळे निवडणूक काळात पत्रकारांसाठी आम्ही काही करतो आहोत एवढ्यापुरताच आमच्या लेखी या घोषणेला अर्थ आहे. पत्रकारांना गाजर दाखविण्याचा प्रयत्न या घोषणेच्या माध्यमातून सरकारने केला आहे.

"प्रेस कॉन्सिल ऑफ इंडिया"च्या धर्तीवर महाराष्ट्रात प्रेस कॉन्सिल स्थापन करावी, अशी पत्रकार संघटनांनी विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना मागणी केली होती. विलासराव देशमुख त्याबाबत सकारात्मकही होते. मात्र तेव्हा ते झाले नाही. नंतरही महत्वाच्या पत्रकार संघटना याचा पाठपुरावा करीत राहिल्या परंतू त्याकडे सर्वच सत्ताधारी पक्षांनी दुर्लक्ष केलं आणि महामंडळासारखी सवंग घोषणा आज सरकारने केली. पत्रकारांना कामगारांच्या श्रेणीत लोटण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. यातून पत्रकारांच्या हाती काही लागणार नाही हे स्पष्ट आहे. त्यामुळे आम्हाला हे महामंडळ मान्य नाही...

**(लेखक हे 'मराठी पत्रकार परिषद' या पत्रकार संघटनेचे मुख्य विश्वस्त असून ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# रंगांची आठवण...

रंगांची आठवण येताना उकलतात सत्ये आणि स्वप्नेसुद्धा. या आठवणी नाजूक जाळीदार पानांसारख्या मिरवत राहतात मनभर, नदीच्या संथ पाण्यावर तरंग उठवत... प्रत्येक शेड्सच्या आपापल्या कथा असतात. रंग रंगवताना त्या बोटांना जाणवतात. कधी स्पष्ट तर कधी अंधुक, कधी उजेडासारख्या लख्खं, तर कधी काळ्याशार पाटीसारख्या... काहीच न उमगणाऱ्या! ऊन-सावलीचा खेळ रंगावा तसा सुरू होतो कॅनव्हासवर रंगांचा चित्रपट...

तुझे हातही असेच रंगांनी माखलेले. लाल, हिरव्या, पिवळ्या, नारंगी अशा सगळ्याच रंगांना स्पर्शन गेलेली तुझी लांबसडक निमुळती बोटं. एकदा तू असाच पाठमोरा चित्र चितारत असताना माझ्याकडे न पाहताच म्हणालास, "तुला एक गंमत सांगू ? प्रत्येक रंगाला असतं आपापलं अस्तित्व, आपापली जाणीव... पण रंगांना सापडत नाहीत दिशा." मीही आवेगाने तुला पाठमोरी मिठी मारत म्हटलं, "रंगांना दिशा सापडत नसल्या तरी अस्तित्व आहेच की! मी होईन या रंगांची दिशा." तुझ्या रंगभरल्या बोटात माझी बोटं अधिकच घट्ट गुंफत...

खरंच, माझ्या बोलण्याला काही अर्थ होता? तू पूर्व तर मी पश्चिम. तू आकाश तर मी जमीन. भिन्न टोकांवर राहणारे दोन विभिन्न प्राणी आपण. पण आता मात्र लख्ख जाणीव झाली, एका तपाच्या प्रवासानंतर. अनुभवानं आलेलं शहाणपण हे कोणत्याही पुस्तकी वाक्यापेक्षा सरसच ठरतं. सगळेच रंग नाही भरता येत चित्रात. कारण नसते तिथे सगळ्याच रंगांना जागा. भडक, उठावदार किंवा नाजूक, सौम्य सगळ्याच रंगांचं मिश्रण करत चित्र पूर्ण होतं. आपली एक कहाणी उमटवत ! तिच्या नजरेतून चित्र पूर्ण होतंही. तरी काही अपूर्ण राहतं... कारण "अपूर्णतेत गोडी आहे" हे सत्य सांगायला रंग विसरत नाहीत तिला. जीव लावतात तिला आतून मनापासून. तीही विरघळत राहते मग रंगात... त्यांच्याच विविध छटा घेऊन !

- पल्लवी शिंदे - माने
डेनवर, कोलोरॅडो, अमेरिका

# पत्र मानस

## दुभाजक सुशोभितकरणाचा नाहक खर्च

दक्षिण मुंबईतील जे जे हॉस्पिटल, भेंडी बाजार परिसरातील मुख्य रस्त्याच्या दुभाजकात काही वर्षांपूर्वी रंगी बेरंगी विजेचे दिवे तसेच फुल झाडे लावून परिसर सुशोभित करण्यात आला होता.परंतु काही काळानंतर या दुभाजकातील रोषणाई,फुल झाडांची बेधर लोकांकडून नासधूस करून विद्रुपीकरण करण्यात आले आहे. वीज उपकरणे गायब करण्यात आलीत.येथील दुभाजक बेधर लोकांचे ,गर्दूल्यांचे आश्रय स्थान आहे.अशा ठिकाणी पुन्हा सदर परिसर सुशोभित करण्यात येत आहे तसेच या ठिकाणी जुन्या बेस्टच्या दुमजली बस गाडी मध्ये वाचनालय सुविधा करण्यात येत आहे.पण हा परिसर किती काळ सुंदर राहील याबाबत शंका आहे.व त्यावर केलेला खर्च त्या परिसरातील समाज कंटक, गर्दुल्ले चोरट्यांमुळे नाहक वाया जाणार अशी शंका वाटत आहे.त्याऐवजी पालिकेने लालबाग ते माटुंगा परिसरातील डॉ.आंबेडकर मार्गावरील दुभाजकाच्या जागी सदर संकल्पना राबविली असती तर योग्य ठरले असते

**- नंदकुमार आ पांचाळ, मुंबई**

## उद्योगक्षेत्रातील अनमोल रत्न

भारताच्या उद्योग क्षेत्रात टाटा हे फक्त नाव नाही तर तो विश्वास, विश्वासर्हतेला असलेला समानार्थी शब्द.या टाटा समूहातील एक अनोमल रत्न म्हणजे रतन टाटा.भारतीय उद्योगविश्वाचा मुकुटमणी असलेले रतन टाटा फक्त उद्योग विश्वासाठीच नव्हे तर सर्व भारतीय समाजासाठी आर्दश होते.ज्यांच्यापुढे सर्वांनीच नतमस्तक व्हावे अशा काही मोजक्या व्यक्तिमत्वांपैकी ते एक होते.सर्वसाधरणपणे भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये उद्योगाची उभारणी करणारे आणि ते उद्योग नावारूपाला आणणाऱ्या उद्योगपतींकडे नेहमीच संशयाने पाहिले जाते.कारण उद्योगपती स्वार्थी आणि संधीसाधू असतात. राजकारण्याशी संबंध ठेवून कामे मिळवितात.पण रतन टाटा हे त्यातले नव्हते.त्यांचंबद्दल कोणीही कधीच शंका घेतली नाही आणि कोणताही आरोप झाला नाही. म्हणून भारतीय औद्योगिक साम्राजाचे अनभिषिक्त महाराज म्हणूनच रतन टाटा यांच्या नावाची नोंद केली गेली आहे. रतन टाटा यांनी फक्त उद्योग क्षेत्रात नाव कमावले नाही तर त्यांनी माणसं जपली.रतन टाटा यांनी उद्योगातून केवळ नफा न कमवता मोठा वाटा ते समाज आणि देशहितासाठी खर्च करीत असत. संकटाच्या काळात त्यांनी देशाला कायम साथ देत, सढळ हस्ते मदत केली. सढळ हस्ते मदत करणारा उद्योगपती अशी त्यांची ओळख होती आयुष्यभर त्यांनी स्वभावातील शालीनता, विनम्रता कधीही गमावली नाही.त्यांचे प्राणि मात्रांवर करण्याचा स्वभाव सर्वज्ञात आहे. तसेच देशाच्या अडचणीत ते ठामपणे राहिले.म्हणूनच रतन टाटा यांच्याकडे एक खरे देशभक्त म्हणून पाहिले जायचे.त्यांनी मिळविलेल्या पैशातून दान केले नसते ,तर ते आज जगातील सर्वात श्रीमंत झाले असते. त्यांचा साधेपणा अनेकां साठी कुतूहलाचा विषय राहिला .रतन टाटा आयुष्य भर साधेपणाने जगले.टाटा समूहाने कोणताही उद्योग सुरू करताना आधी देश हिताचा विचार केला. रतन टाटा यांनी अर्थव्यवस्थेला दिलेले योगदान आणि त्यातूनच महत्वाचं माणूस म्हणून जे त्यांचे योगदान आहे, ते अफाट आहे.अशा व्यक्तीला आजपर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असले, तरी देशाचा सर्वोच्च पुरस्कार ' भारतरत्न ' त्यांना देण्यात आला नाही. आता रतन टाटा यांना मरणोत्तर ' भारतरत्न ' पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे असा ठराव राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठविला आहे. खरे तर अशा महान व्यक्तीला हयात असतानाच सन्मानित करायला हवे होते. कारण हयात असताना झालेला सन्मान कधीही चांगला. आता त्यांना पुरस्कार दिला तरी तो उपचाराचा भाग ठरणार आहे. रतन टाटा आता उद्योगक्षेत्राच्या क्षितिजावरून लुप्त झाले असले तरी भावी पिढीला बरेच शिकण्यासारखे आहे.

**- सुनील कुवरे, शिवडी**

## एसआरएची घरे आणि मूळ मालक

एसआरएची घरे १० वर्षे विकू नये हा निर्णय बदलून सरकारने तो आता ५ वर्षावर आणला.त्यामूळे घरे विकत घेतलेल्या अनेक लोकाना याचा फ़ायदा झाला आहे.परंतू ही घरे नावावर करताना अनेक समस्या उत्पन्न होतात.उदा.मूळ मालकाला घरे विकताना मागितलेली रक्कम देऊन आणि करारात घरे नावावर करताना मूळ मालकाने सर्व सहकार्य करण्याचे मान्य करुनही बहुतेक मूळ मालक सहमती देण्यासाठी ५ ते १० लाखाची मागणी करतात. वास्तविक सोसायटीला कराराची प्रत दिल्यानंतर सदर सोसायटीने घरे विकत घेतलेल्याना एन ओसी आणि ओसी देणे क्रमप्राप्त आहे परंतू त्यासाठीही मूळ मालकाची परवानगी का लागते? हे कोडे उलगणारे नाही.घरे नावावर करताना तरी एसआरएची घरे विकल्यानंतर मूळ मालक आणि विकत घेतलेल्या व्यक्तिमधील झालेल्या काराराची कागदपत्रे पाहुन घरे नावावर करुन द्यावीत त्याचप्रमाणे घरे नावावर करताना मूळ मालकाचा काहीही संबध राहाणार नाही असा नियम करणे आवश्यक आहे त्यामूळे घरे नावावर करताना मूळ मालकाकडून पैश्यासाठी होणारी अडवणुक थांबेल आणि घरे विकत घेतलेल्याना मूळ मालकाशिवाय घरे नावावर करता येतील.तरी एसआरएच्या सबंधित अधिका-यानी याची दखल घ्यावी.

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

## मोठी घरे घेण्याकडे लोकांचा कल ... एक विचार

अलीकडे लोकांचा कल मोठी घरे घेण्याकडे वळला आहे . किंमत जास्त असूनही लोक मोठ्या आकाराचे प्लॅट खरेदी करत आहेत असे चित्र देशभर आहे . विशेषतः गेल्या सुमारे सात वर्षांमध्ये फ्लॅट चा आकार सरासरी तब्बल ३२ टक्के पर्यंत वाढला आहे .एका आकडेवारीनुसार कोरोना साथीच्या आधी म्हणजे २०१९ साली फ्लॅटचा सरासरी आकार ११४५ स्केअर फूट होता तर २०१४ च्या पहिल्या सहामाहीत तो वाढून तब्बल १५१३ स्केअर फूट होता ही बातमी नुकतीच वाचण्यात आली दिल्लीसारख्या शहरात तो दुप्पट झाला आहे या उलट मुंबई सारख्या शहरात तो ५ टक्क्यांनी वाढला आहे मोठी घरे लोक का पसंद करता आहेत ? कोरोनाच्या साथी नंतर अनेकांना असे वाटू लागले आहे कि घराचा एरिया मोठा हवा .याला कारण म्हणजे अनेकांना घरातून काम सुरु झाले आहे . त्यामुळे साहजिकच आपला त्रास इतरांना नको अशी भावना वाढीस लागली आहे ऑफिस कामासाठी स्वतंत्र खोली हवी . याशिवाय आता लोकांच्या कडे पैसाही मोठ्या प्रमाणात खेळू लागला आहे . मुलांच्या अभ्यासाच्या गरजा वाढू लागल्या आहेत . त्यांना स्वतंत्र खोलीची आवश्यकता भासू लागली आहे . याशिवाय घरात कोणी वडील माणसे असल्यास त्यांना वेगळ्या खोलीची आवश्यकता भासू लागली .एकूणच सुमारे दोन तीन दशकापूर्वी लोक वन बीएचके फ्लॅट घेत असत आता लोक त्याऐवजी दोन बीएचके फ्लॅट खरेदी करत आहेत वास्तविक मोठा एरिया काही दिवस सुखावतो त्यानंतर झाडलोड, तसेच त्याची स्वच्छता य त्यामुळे अनेकांचा जीव मेटाकुटीस येतो . पूर्वी लिफ्ट नसले तरीही लोक तीन चार मजल्यावरील फ्लॅट खरेदी करत असत . आता दोन मजल्यावर सुद्धा लोकांना लिफ्ट हवी आहे दिवसेंदिवस प्रत्येकाला आरामदायी जीवन असावे असे वाटू लागले आहे व तशा सुविधा सुद्धा दिवसेंदिवस उपलब्ध होत आहेत आत्ता अनेक घरात अत्यानुधिक धुण्याची भांडी घासण्याची तसेच केर काढण्यासाठी मशिन्स येऊ लागली आहेत एकूणच लोकांचा कल सुबत्तेकडे जातो आहे असे वाटते त्यामानाने आरोग्य तसेच व्यायाम या गोष्टीकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होत आहे

**- शांताराम वाघ पुणे**

## निवडणूका लढताना काँग्रेसमध्ये समन्वय आणि समजूतदारपणाचा अभाव

हरयाणामध्ये आपल्याच पक्षाची सत्ता येणार असे संकेत येताच प्रत्येक काँग्रेस उमेदवारांची मंत्रिपदासाठी धावपळ सुरू झाली होती. ज्यांनी ज्यांनी पदांच्या लालसेने निवडणुकीत आपला सहभाग नोंदविला त्यांनी आपल्या समर्थनार्थ गट स्थापन केले. प्रत्येक गटाने आपली किंमत वाढविण्यासाठी दुसऱ्या गटाचे महत्व कमी करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. आपसातील नेते साधी उमेदवारी आणि त्यापुढे मंत्रीपदे पटकाविण्यासाठी एकमेकांत शह काटशह देण्यासाठीचा पूर्वापार चालत आलेल्या परंपरांचा पगडा कायम ठेवला. काँग्रेसजनांनी थोडा धीर, समन्वय आणि समजूतदारपणा दाखवला असता तर राज्यातील निकालाचे चित्र पालटले जाण्यात काहीच अडचण नव्हती. हिच बाब मुख्यमंत्री पदाच्या दावेदारांच्या बाबतीत दिसून आली. भूपिंदर हुड्डांनी कुमारी शैलजा यांना आपल्या मार्गातून बाजूस सारले परिणामी त्या निवडणुकीच्या प्रचारापासून दूर झाल्या. काही स्थानिक नेत्यांनी स्वतःच्या वैयक्तीक भल्यासाठी पक्षाचा विचार करणे टाळले. ह्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी तयारीत असण्याऱ्या भाजपाने आपल्या रणानितीत योग्य ते बदल घडवून आपली बाजू मजबूत करून घेतली. दुसरीकडे काँग्रेस पक्षाचे नेते अन्य स्वपक्षियांमधील जातीय भेदभाव, गटबाजी, शह काटशह करण्यात गुंतत राहिले. त्यांना समजविणारे वरिष्ठ नेते मध्यस्तीचा प्रयत्न करेपर्यंत झालेला उशीर काँग्रेसची मते विभागून गेला त्याच्याबरोबर हातातोंडाशी येऊ घातलेली सत्ताही गमावून बसले आहेत. राष्ट्रिय पातळीवरील पक्ष नेत्यांना या पराभवाचा धक्का बसताच चीड आणि संताप व्यक्त करण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता. निदान हरयाणातील या अनुभवानंतर आपसांत गटबाजी, शह - काटशह देणे थांबविले नाही तर महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्याचे परिणाम दिसून येतील. कारण अजूनही महाराष्ट्रातील नेत्यांमध्ये महविकास आघाडीतील घटक पक्षांत जागा वाटपावरून तडजोड करण्याचे ठरले जात नाही. मतदासंघावर दावे, उमेदवार बदलण्याचे संकेत, घटक पक्षांच्या उमेदवारांवरून नाराजी असे प्रश्न आघाडी पक्षांच्या विविध स्तरांवरील प्रत्येक सभा, चर्चासत्र यांमधून चर्चिले जात असताना समन्वय साधला जात नाही, याच गोष्टी समजूतदारपणाने चर्चा करून मार्ग काढता येण्यासारख्या आहेत पण प्रत्येक काँग्रेस नेत्याकडे धीराचा अभाव दिसून येत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी कुणाला निवडावे यावरूनही अनिश्चितता दिसत आहे. काही उमेदवार, जागा यांवरून खलबते सुरू आहेत असे चित्र दिसत आहे. आजवर विधानसभा निवडणुकांत काँग्रेसने मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केलेला नाही त्यावरून त्या पक्षातील अनिश्चितता किंवा दुमत असण्याचे अन्य राजकीय पक्ष आणि मतदार त्यांचा व्होरा मांडत आहेत. त्यांनी त्याप्रमाणे समजूत करून घेतल्यास त्याचा परिणाम मतदानावर होण्याच्या शक्यता अधिक आहेत हे काँग्रेसजन केव्हा समजून घेतील.?

**- स्नेहा राज, गोरेगांव.**

## शिवसेना शिवाजी पार्क परंपरा

शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्ट १९६६ ला शिवाजी पार्क येथे प्रबोधनकार ठाकरे यांच्या उपस्थितीत प्रचंड गर्दीत पार पडल्यानंतर त्यानंतरच्या प्रत्येक दसऱ्याला एक मैदान, एक वक्ता, मा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मागील ५७ वर्षे मैदान गाजवत होते. बाळासाहेबांचा मृत्यू (१७ नोव्हेंबर २०१२) नंतर पक्षप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी मागील १३ वर्षे त्याच उत्साहाने मेळावे घेतले आहेत. शिवसेना भाजप युतीच्या राज्याच्या शपथ विधी सोहळयास मनोहर जोशी यांनी १४ मार्च १९९५ रोजी शिवजी पार्क येथे शपथ घेतली. त्याचप्रमाणे महाविकास आघाडी तर्फे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी २८ नोव्हेंबर २०१९ रोजी शपथ घेतली. अशाप्रकारे तत्कालीन महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकदाही शिवाजी पार्क वर भाषणं केलेले नाही. तरी आता शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शिवजीपार्क दसरा मेळावा हे जिव्हाळाचे नाते, परंपरा आहे.

**- विजय ना. कदम लोअर परळ.**

## कर्मचाऱ्यांच्या घराची स्वप्नपूर्ती कधी

महाराष्ट्र राज्याचा कारभार चालवण्यासाठी कर्मचाऱ्यांचा एक भला मोठा समूह लागतो तो म्हणजेच राज्य सरकारी, केंद्र सरकारी आणि मंत्रालयातील कामगार - कर्मचारी व अधिकारी इत्यादी होय. यातील बरेचसे कर्मचारी तथा अधिकारी बंधु व भगिनी या आपल्या बांद्रा पूर्व येथील शासकीय वसाहती किंवा इतरत्र राहतात. या सर्वांची एकच मागणी आणि अपेक्षा आपल्या मायबाप सरकारकडून आहे ती म्हणजे त्यांच्या हक्काच्या व सवलती दराच्या घराची आहे. मनसे सारख्या एखाद्या राजकीय पक्षाने त्यांची बाजू सरकार दरबारी ठामपणे मांडली आहे. मुंबई बांद्रे शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांचे वसाहती मध्येच घर मिळण्याचे स्वप्न आता पुन्हा एकदा भंगले आहे. सरकार हजारो एकर श्रेत्राच्या मोक्याच्या जमीनी एसआरए प्रकल्प,स्मारक इत्यादी साठी मोफत उपलब्ध करून देत आहे. बांद्रा शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांची मागणी देखील जुनी व योग्य असल्याने शासनाने वसाहतीतच कर्मचाऱ्यांना कायमचे घर द्यायलाच हवे असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

# 'केडीएमसी'त पाणीपुरवठा मंगळवारी बंद

**कल्याण :** कल्याण, डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा मंगळवारी (ता.१५) सकाळी १० ते संध्याकाळी सहा या वेळेत देखभाल, दुरुस्तीच्या कामासाठी कल्याण डोंबिवली पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती पाणी पुरवठा विभागाच्या यांत्रिकी विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने दिली. कल्याण, डोंबिवली शहरांना उल्हास नदी काठच्या मोहिली, नेतिवली येथील जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला जातो. या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रातील विद्युत, यांत्रिकी उपकरणांच्या देखभाल, दुरुस्तीचे काम मंगळवारी (ता. १५) पालिकेच्या नियंत्रणाखाली ठेकेदाराकडून केले जाणार आहे. या दुरुस्तीच्या कालावधीत कल्याण शहरासह, कल्याण ग्रामीण भागातील मांडा, टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी, कल्याण पश्चिमेतील ब प्रभागातील मिलिंदनगर, योगीधाम, चिकनघर, बिर्ला महाविद्यालय परिसर, मुरबाड रस्ता परिसरातील पाणी पुरवठा बंद राहणार आहे. डोंबिवली पूर्व, पश्चिमेचा पाणी पुरवठा या कालवधीत बंद राहणार आहे.



**म ह त्वा चे**

## पाचशे रुपयांसाठी तरुणाची हत्या

**ठाणे :** उसने घेतलेले पाचशे रुपये न दिल्याने एकाची हत्या करून मृतदेह जाळल्याप्रकरणी ठाणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने एका आरोपीला अटक केली आहे. तर, आणखी एक आरोपी फरार आहे. हत्येचा प्रकार आठवड्यापूर्वी भिवंडी तालुक्यातील वडपे गावाच्या हद्दीत घडला होता. वडपे येथील गंगारामपाडा येथे राहणारा सुरेश तारासिंग जाधव याच्या हत्येप्रकरणी ३ ऑक्टोबर रोजी भिवंडी तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सुरेश याची हत्या केल्यानंतर आरोपींनी पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह जाळला होता. केवळ पायाचा काही भागच शिल्लक राहिला होता. घटनास्थळी मिळालेले पाकिट आणि अन्य वस्तूंवरून मृतदेह सुरेश याचा असल्याचे स्पष्ट झाले. या गुन्ह्याची उकल करण्यासाठी ठाणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्या नेतृत्वाखाली पथकांची स्थापना करण्यात आली. पोलिस तपासामध्ये बारकू मारुती पडवळे याचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीमध्ये सुरेश याच्या हत्येचा उलगडा झाला. बारकू, त्याचा मित्र देवा आणि सुरेश हे तिघे भंगार व्यवसाय करत असून सुरेश याने देवा याच्याकडून पाचशे रुपये उसने घेतले होते. तो पैसे देत नसल्याने ३ ऑक्टोबर रोजी रात्री बारकू आणि देवा यांनी त्याला वडपे गावाच्या हद्दीत नेले आणि मद्य पाजून पैसे का देत नाही, असा जाब विचारत त्याला मारहाण केली. देवा याने लोखंडी पाइपने डोक्यात मारत सुरेश याची हत्या केली. नंतर दोघांनी मिळून मृतदेह कचराकुंडीत टाकून मृतदेह जाळला. पोलिसांनी बारकू याला अटक केली आहे. पोलिस निरीक्षक दादासाहेब एडके तपास करीत आहेत.

# 50 रुपयांची फाटकी नोट का दिली? टिटवाळ्यात रिक्षा चालकाच्या मारहाणीत प्रवाशाचा मृत्यू

प्रतिनिधी
**टिटवाळा**

टिटवाळ्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे. रिक्षा चालकाला भाडे देण्यासाठी प्रवाशाने 50 रुपयांची नोट दिली. मात्र नोट फाटलेली असल्याने रिक्षा चालक आणि प्रवासी यांच्यामध्ये टोकाचा वाद झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झालं. या भयंकर मारहाणीत प्रवासी अंशूमन शाही हे खाली कोसळलं. त्यांना उपचारासाठी रुग्णलयात नेले असता त्यांचा मृत्यू झाला. कल्याण जवळील टिटवाळा परिसरात घडलेल्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी टिटवाळा पोलिसांनी रिक्षा चालकाच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी रिक्षा चालक राजा भोईर याला अटक केली आहे.



कल्याण नजीक टिटवाळा परिसरात असलेल्या हरी ओम व्हॅली इमारत क्रमांक सातमध्ये अंशूमन शाही हे त्यांच्या कुटुंबासोबत राहत होते. त्यांना एक मुलगी आणि पत्नी असं त्यांचं कुटुंब आहे. गुरुवारी रात्री ते रिक्षातून घराजवळ आले. या वेळी त्यांनी प्रवासी भाडे देण्याकरीता ५० रुपयांची नोट काढली. या फाटक्या नोटेवरून रिक्षा चालकाने प्रवाशाला प्रश्न केला. ५० रुपयांची नोट फाटलेली असल्याने रिक्षा चालकाने त्यांच्याशी वाद घातला. या वादात रिक्षा चालक आणि अंशूमन यांच्या हाणामारी झाली.

या हाणामारीत अंशूमन हे बेशुद्ध होऊन खाली कोसळले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. या संपूर्ण घटनेनंतर त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी टिटवाळा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक सुरेश कदम यांनी अंशूमन यांचा भांडणानंतर हृदयविकाराने मृत्यू झाल्याची माहिती दिली. प्रवाशाच्या मृत्यूने परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी रिक्षा चालक राजा भोईर याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

# काम करणारा भाऊ पाहिजे की...बनवणारी बहीण?

## स्नेहल जगतापांवर टीका करताना गोगावलेंची घसरली जीभ

प्रतिनिधी
**महाड**

शिवसेना नेते भरत गोगावले यांनी वादग्रस्त विधान केलं आहे. स्नेहल जगतापांबद्दल बोलताना त्यांनी वादग्रस्त विधान केलं आहे. रायगमधील कार्यक्रमात बोलताना त्यांनी स्नेहल जगताप यांच्यावर टीका करताना आक्षेपार्ह शब्दाचा वापर केला. त्यांच्या या विधानावरुन वाद निर्माण होण्याची शक्यता असून, आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे.


महाडमधील कार्यक्रमात बोलताना भरत गोगावले यांची जीभ घसरली आहे. सांगा तुम्हाला कोण पाहिजे, काम करणारा भाऊ पाहिजे की *** बनवणारी बहिण पाहिजे असं वक्तव्य त्यांनी केलं आहे. त्यांच्या या विधानामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने येण्याची शक्यता असून प्रत्युत्तर दिलं जाऊ शकतं.





आदित्य ठाकरे यांनी भरत गोगावले यांच्या विधानावर टीका केली आहे. मुख्यमंत्र्यांना याबाबत लाज वाटत नाही अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला आहे. आदित्य ठाकरे यांनी वांद्रे येथे एका कार्यक्रमात हजेरी लावली. यावेळी त्यांना भरत गोगावले यांच्या विधानाबद्दल विचारलं. "त्यांचं चारित्र्य पाहता भरत गोगावले यांची जीभ सातत्याने घसरत असते. त्यांच्या काखतेला रूमाल घसरत नाही. पण जीभ मात्र घसरते मुख्यमंत्र्यांना याबाबत लाज वाटत नाही," अशी टीका आदित्य ठाकरेंनी केली आहे.

# दोन मुलांसाठी नवऱ्यानं घेतला पत्नीचा जीव; दिवसाढवळ्या महिलेची हत्या



**भाईंदर**

मिरा भाईंदरमध्ये एक धक्कादायक घटना समोर आलीय. भररस्त्यात दिवसाढवळ्या महिलेची हत्या झाल्याची घटना मिरारोडच्या नयानगर घडलीय. दोन मुलाच्या ताब्यासाठी नवऱ्यानं पत्नीवर चाकू हल्ला करत तिचा खून केला. ही घटना मिरारोडच्या नयानगरमधील एन.एच.शाळेसमोरील रस्त्यावर घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास नया नगर पोलिस करत आहेत.

मृत महिलेचे नाव अमरीन खान वय वर्षे ३६ आहे तर आरोपी पतीचे नाव नदीम खान ३७ वर्ष आहे. प्राथमिक माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून पती पत्नीमध्ये वाद सुरू होते. पती नदीम खान आणि अमरीन खान यांना दोन मुलं आहेत. नदीम यांना दोन्ही २ मुलांचा ताबा हवा होता. त्यावरुन नवरा बायकोमध्ये वाद सुरू होता. मुलांचा ताबा देण्यास अमरीन यांचा नकार होता. त्याचा राग नदीमच्या मनात होता, त्याच रागातून त्याने पत्नी अणरीन यांच्यावर भर दिवसा चाकू हल्ला करत तिची अस्मिता अनिल इमारती समोरील रस्त्यावर हत्या केली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं असून पुढील तपास करत आहेत.

# स्वीप नोडल अधिकाऱ्यांमार्फत बेघर व्यक्तींना निवडणूक ओळखपत्रांचे वाटप

## बेघर व्यक्ती देखील करणार मतदान !



**कल्याण**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रातील बेघर व्यक्तींसाठी कल्याण पश्चिमेतील 3/क प्रभागात, आणि डोंबिवली पूर्वेतील पांडुरंगवाडी तसेच टिटवाळा परिसरात बेघर निवारा केंद्राची व्यवस्था केली आहे. काल जागतिक बेघर दिनाचे औचित्य साधून डोंबिवलीतील सावली निवारा केंद्र येथे जिल्हा स्वीप नोडल अधिकारी संजय जाधव यांनी निवडणूक ओळखपत्रांचे वाटप केले आणि या व्यक्तींना आगामी विधानसभा निवडणूकीत मतदान करण्याचे आवाहन केले.


## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड,
बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२११०३, ता. अंबरनाथ, जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in
वेबसाईट: https://kbmc.gov.inkbmc.gov.in

जा.क्र : कुबनप / साबां / १३२३ /२०२४-२५ दिनांक:-११ / १० /२०२४

**जाहिर ई- निविदा सुचना क्र. ३८/२०२४-२५**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत ०१ कामासाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई- निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.११ /१०/२०२४ ते दि.१८१-२/२०२४ रोजी दुपारी.१२.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि. २१/११/२०२४ रोजी दुपारी १२.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

शिक्का

सही/-
(मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी तथा
प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद



## बृहन्मुंबई महानगरपालिका

**के ई एम हॉस्पिटल परेल मुंबई ४०००१२**
**ई-निविदा सूचना**
**क्र. केईएमएच/३७०२/एईएमई दिनांकित ११.१०.२०२४**

हि ई-निविदा सूचना आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका (बृमनपा) चे महापालिका आयुक्त खालील कामासाठी "दर तत्वावर" ई-निविदा मागवीत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम ठेव (रु.) | ऑन लाईन डाऊनलोडिंगसाठी सुरु दिनांक आणि वेळ | ऑन लाईन डाऊनलोडिंगसाठी समाप्ती दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|
| | २ | ३ | ४ | ५ |
| १ | के.ई.एम. हॉस्पिटल येथे प्युअर एअर आणि सरफेस अम्बीयंसचे एसआयटीसी. निविदा आयडी-२०२४_एमसीजीएम_११९३८४८ | १९०००/- @ १% | ११.१०.२०२४ (१७.०० वा.) | १८.१०.२०२४ (१७:०० वा. ) |
| २ | के.ई.एम. हॉस्पिटलच्या मायक्रोबायोलॉजी सेक्शन, बायोकेमिस्ट्री, मोर्च्युरी मध्ये करायची दुरुस्तीची विविध कामे. निविदा आयडी क्र. २०२४_ एमसीजीएम_१११३८५० | २००००/- @ १% | ११.१०.२०२४ (१७.०० वा.) | १८.१०.२०२४ (१७:०० वा. ) |
| ३ | लिफाफा ए उघडण्याचा दिनांक | १९.१०.२०२४ | | १७:३० वा. |
| ४ | लिफाफा बी उघडण्याचा दिनांक | १९.१०.२०२४ | | १७:३० वा. |
| ५ | लिफाफा सी उघडण्याचा दिनांक (मूल्य बोली) | अनुसूची नुसार | | |

निविदेच्या अधिक माहितीसाठी इच्छुक निविदाकार महानगरपालिका संकेतस्थळ (http:portal.mcgm.gov.in) ला भेट द्या. तथापि बोली महाटेंडर पोर्टल (https://mahatenders.gov.in) द्वारे मागविण्यात येत आहेत. सदर निविदा सूचनेच्या संदर्भात जर कोणतेही शुद्धिपत्रक जारी केले असल्यास ते केवळ बृमनपा पोर्टल वरच प्रसिद्ध केले जाईल. शुद्धिपत्रक स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केले जाणार नाही.

**निविदा कागदपत्रे टपालाद्वारे वितरीत किंवा स्विकारली जाणार नाहीत.**

पीआरओ/१७४७/जाही/२०२४-२५

सही/-
अधिष्ठाता
(केईएम रुग्णालय)

स्वमर्जीने औषधोपचार करू नका.


# अक्षय शिंदेसाठी 'ते'च वाहन का निवडले?

## पोलिस चकमकप्रकरणी सीआयडीचा पोलिसांना सवाल

प्रतिनिधी
**बदलापूर**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेशी ज्या वाहनात चकमक झडली त्याच मोठ्या वाहनाची निवड त्याला नेण्यासाठी कोणत्या कारणास्तव केली गेली, असा सवाल गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) अधिकाऱ्यांनी ठाणे पोलिसांच्या मोटार परिवहन विभागाला केला आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

आरोपी अक्षयचा पोलिस चकमकीत मृत्यू झाल्यानंतर या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला होता. याप्रकरणी पुणे सीआयडीचे विशेष पोलिस महानिरीक्षक सारंग आव्हाड आणि नवी मुंबईच्या कोकण भवन येथील सीआयडीचे अधीक्षक राहुल वाघुंडे ठाणे पोलिसांकडे चौकशी करीत आहेत.

आरोपी एकच असूनही त्याला वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय शिंदे आणि सहायक पोलिस निरीक्षक नीलेश मोरे यांच्यासह चारही पोलिस नियंत्रणात का आणू शकले नाहीत? मोठ्या वाहनाची गरज होती का? अशी विचारणा एका पत्राद्वारे सीआयडी अधिकाऱ्यांनी केल्याची माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

बदलापुरात मोठे जनआंदोलन झाले होते. त्यामुळे आरोपीवर हल्ला होण्याची शक्यता तसेच संवेदनशील प्रकरण असल्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठ्या वाहनाची निवड करावी, लागल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने खासगीत दिली.


## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय ०२२ - २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२ - २७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/मातंवि/ ३०२४/प्र.क्र. १५/५०१ / २०२४ दिनांक : ११/१०/२०२४

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | निविदा/पमपा/मातंवि/ ३०२४ प्र.क्र.१५/५०१/२०२४-२५ | पनवेल महानगरपालिका शाळांमध्ये VR / वर्गखोल्या लागू करणेबाबत. |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या www.mahatenders.com या संकेतस्थळावर दि.१२/१० /२०२४ ते दि. २८/१० / २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.५५७/५५९/२०२४
संदर्भ :- जा.क्र. पमपा/मातंवि/३०२४/प्र.क्र.१५/५०१/२०२४ दिनांक: ११/१०/२०२४ रोजीचे पत्रान्वये.

सही/-
उप आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका



## बृहन्मुंबई महानगरपालिका

**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**कस्तुरबा हॉस्पिटल**
साने गुरुजी मार्ग, मुंबई ४०००११
क्र. एचओ /६३२५/ केएच दि. ११/१०/२०२४

**ई-निविदा सूचना**

बृमनपाचे महानगरपालिका आयुक्तांसाठी आणि त्यांच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक कस्तुरबा हॉस्पिटलद्वारे खाली नमूद करण्यात कामासाठी ऑन लाईन ई-निविदा मागवित आहेत.

| अनु. क्र. | बोली क्र. | प्रकाराचे नाव | परिमाण |
|---|---|---|---|
| १. | २०२४_एमसीजीएम_ ११११३४३_१ | कस्तुरबा हॉस्पिटल येथे एक्झामिनेशन ग्लोवज लॅटेक्स २४ सीमी (नॉन स्टरलाईल) लहान, मध्यम, मोठे करिता ई-निविदा | परिमाण देयकानुसार (बीओक्यू) |

बोली सुरु: १२.१०.२०२४ रोजी १०:०० वा. बोली समाप्ती: २१.१०.२०२४ रोजी १६:०० वा.
संपर्क अधिकारी: डॉ. चंद्रकांत पी. पवार, वैद्यकीय अधीक्षक, कस्तुरबा हॉस्पिटल
दूर क्र. ०२२-२३०२७७६९ ई-मेल: ms01kasturba.phd@mcgm.gov.in

बोली योग्य प्रक्रियेने सादर ऑनलाईन सादर कराव्यात. पूर्ण ई-निविदा कागदपत्रे महाटेंडर पोर्टल http://portal.mcgm.gov.in वर उपलब्ध आहे.

पीआरओ/१७४५/जाही/२०२४-२५

सही/-
वैद्यकीय अधीक्षक,
कस्तुरबा हॉस्पिटल

आठवड्याचा एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळा.



## बृहन्मुंबई महानगरपालिका

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्र क्र. | २०२४_एमसीजीएम_१११३५५५ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | एम. डब्ल्यू. देसाई म्युन. जन. हॉस्पिटल मालाड (पु) येथे विविध ओटीज करिता ॲटीमायक्रोबिअल हायप्रेशर लॅमिनेटस हॅचवे बदलण्याचे आणि रिफरबिशमेंटचे काम. |
| निविदेचे शुल्क | रु. ३३००/- (+ १८% जीएसटी) |
| निविदेचे मूल्य (अंदाजे मूल्य) | २१,३५,९७६/- (जीएसटी वगळता) |
| बोली सुरक्षा ठेव/ इरठे | रु. २५,३००/- |
| निविदा वितरण आणि विक्री दिनांक | १५.१०.२०२४ रोजी ११.०० वा. पासून |
| बोली सुरक्षा ठेव / इरठे सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ | २१.१०.२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए, बी आणि लिफाफा सी सादरीकरण (ऑन लाईन) | २१.१०.२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत |
| पूर्व बोली बैठक | लागू नाही |
| लिफाफा ए उघडणे (बोली उघडणे) | २२.१०.२०२४ रोजी १६:०० वा. नंतर |
| पत्रव्यव्हाराचा पत्ता | ह्यांचे कार्यालय: ई. ई. यांत्रिकी (दक्षिण) बृमनपा महापालिका कार्यशाळा, आर. एस. निमकर मार्ग, भायखळा, मुंबई ४०० ००८ |
| बोली उघडण्यासाठी ठिकाण | ई. ई. कार्य. (दक्षिण) ह्यांच्या कार्यालयामध्ये ऑन लाईन |
| ए) संपर्क व्यक्ती | श्री. ए. सी. मोहिते |
| बी) दूरध्वनी कार्यालय | ०२२ २३०८३०५१/ ५२/ ५३/ ५४ |
| सी) ई-मेल आयडी | Eemechsouth.me@mcgm.gov.in |
| डी) संकेतस्थळ | https://portal.mcgm.gov.in/ tenders https://mahatenders.gov.in |

सदर निविदा कागदपत्रे हस्तांतरीत करता येणार नाहीत.
बृमनपा कोणतेही कारण न देता वरील विषयासाठी कोणताही अर्ज स्वीकारण्याचे किंवा स्वीकारलेला कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

पीआरओ/१७४०/जाही/२०२४-२५

सही/-
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी (दक्षिण)

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.



## नवी मुंबई महानगरपालिका

**अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सुचना क्रमांक -नमुंमपा/शहर अभियंता/246/2024-25**

**कामाचे नाव:-** दिघा विभागातील गणपती बाप्पा तलावातील गाळ काढून सुशोभिकरण करणे.

**अंदाजपत्रकीय रक्कम (रु.).:-** 2,43,43,365/-

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.11/10/2024 रोजी प्राप्त होतील. फेर-निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचेआहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संर्पक करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/623/2024



संभाजीनगर सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ



|| विक्रोळीची दुर्गामाता || मोरपंखी - मोरपंखी हिरवा हा या दिवसाचा रंग आहे. असे मानले जाते की भगवान शिवाच्या शरीराची एक बाजू देवी सिद्धिदात्री आहे. त्यामुळे त्यांना अर्धनारीश्वर या नावानेही ओळखले जाते. शास्त्रानुसार या देवीची उपासना करून भगवान शिवाने सर्व सिद्धी प्राप्त केल्या.



प्रभातची माता, प्रभात मित्र मंडळ, प्रतिक्षानगर, सायन कोळीवाडा, मुंबई



## श्री साईबाबांच्या १०६व्या पुण्यतिथीनिमित्त शिर्डीत भक्तांची मांदियाळी

नवरात्री आणि दसऱ्याच्या मुहूर्तावर येणाऱ्या शिर्डीच्या श्री साईबाबांच्या १०६व्या जयंतीनिमित्त शिर्डी मंदिराच्या साई बालाजी प्रवेशद्वारावर नयनरम्य सजावट करण्यात आली आहे.हि अफलातून सजावट पाहण्यासाठी श्री साई भक्तांची मोठी गर्दी होत आहे. साईबाबा भक्त शिर्डीच्या साईबाबा ट्रस्टने बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त केलेल्या सोयी -सुविधांचे आणि सजावटीचे मुक्त कंठाने कौतुक करीत आहेत.




कुलस्वामींनी. तरुण मित्र नवरात्रोत्सव मंडळ, इमारत क्रमांक १०,११ व ११ अ काळाचौकी



ग्रँट रोड ( फॉर्जेट स्ट्रीट ) येथील जय हरी ची जगदंबा आई भवानी



रामबागची माता राणी, अंधेरी (पू.)




## प्रभादेवीत नारी शक्तीवरील अन्यायाविरूद्ध जागृती

जुन्या प्रभादेवीच्या मोतीवाला बंगला सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाने देशात होणाऱ्या नारीशक्तीवरील अन्यायाविरोधात जनजागृती करणारा अप्रतिम देखावा सादर केला आहे.द्रौपदी वस्त्रहरणापासून ते थेट बदलापूर बालिका अत्याचारापर्यंतच्या दुराचाराचे दर्शन घडवणारे देखावे आणि या दुराचाऱ्यांपासून महिलांनी स्वसंरक्षणाचे धडे घेण्याचा सल्ला देणारे व अत्याचाऱ्यांना फांशीची शिक्षा देण्याची मागणी करणारे साकडे आई भवानीला घालणारा दृक- श्राव्य सजावट मंडळाने केली आहे. या मंडळाचे यंदा ५९वे वर्ष असून सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत मंडळ पुढच्या वर्षी आपला हीरक महोत्सव साजरा करणार आहे. मंडळाचे अध्यक्ष अनिल सीताराम पाटील असून सरचिटणीस मल्हार सुबोध पाटील हे आहेत. सजावटीची व देखाव्याची सुरेख संकल्पना निखिल जुवेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांची आहे.



मुंबई विद्यापीठ, फोर्ट परिसर कर्मचारी



दादर सार्वजनिक वाचनालय ,दादर महिला कर्मचारी वर्ग



उषा सोसायटी साईकृपा कॉम्प्लेक्स काशिगाव, मीरारोड



अंबरनाथ नगरपरिषद महिला कर्मचारी



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, (महापारेषण) सांघिक कार्यालय, वांद्रे



महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, वांद्रे, मुंबई येथील वित्त व लेखा विभागात कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचारी



वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे कार्यालयातील महिला अधिकारी/कर्मचारी



ज्युपिटर हॉस्पिटल, ठाणे



यज्ञ ब्रँण्डस्केप्स प्रायव्हेट लिमिटेड,ठाणे कर्मचारीवर्ग



ईटिसी केंद्र वाशी विभागातील कर्मचारी



आकार ॲडव्हर्टायझिंग टीम, मुंबई



भायखळा इ वॉर्ड महापालिका कार्यालय

## श्री गणेश आखाड्याच्या कुस्तीपटूंचे यश

**मुंबई :** जिल्हा क्रीडा परिषद, रायगड व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड आणि पोलिस मुख्यालय, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कळंबोली येथे आयोजित करण्यात आलेल्या मुंबई विभाग अंतर्गत शालेय कुस्ती स्पर्धेत मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या सौजन्याने व मिरा भाईंदर कुस्तीगीर संघ संचालित श्री गणेश आखाड्यातील मल्लांनी ४ सुवर्ण व ५ कांस्य पदकांची कमाई केली. त्यांच्या ओम जाधव, मनस्वी राऊत, कोमल पटेल, डॉली गुप्ताने सुवर्ण पदक पटकावली. तर कविता राजभर, स्नेहा गुप्ता, सुप्रिया गुप्ता, शिवांश जालुई आणि आर्दश शिंदे यांनी कांस्य पदके मिळविली. प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या पैलवानांची निवड राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेकरिता करण्यात आली आहे. पदक विजेत्यांना वस्ताद वसंतराव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.श्री गणेश आखाड्यातर्फे सर्व पदक विजेत्यांचे खास अभिनंदन करण्यात आले तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देखील देण्यात आल्या.



## पाकिस्तान जागतिक कसोटी अजिंक्यपद चॅम्पियनशिप फायनलच्या शर्यतीतून बाहेर

### मोठ्या विजयासह इंग्लंडची दमदार मजल



वृत्तसंस्था
■ मुलतान

पाकिस्तान क्रिकेट संघाला घरच्या मैदानावर अजून एक लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. पाकिस्तानी संघ इंग्लंडविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्याच सामन्यात पराभूत झाला आहे. पाकिस्तानने पहिल्या डावात फलंदाजी करताना ५५० हून अधिक धावा केल्या होत्या, मात्र त्यानंतरही संघाला एका डावाने मोठा पराभव पत्करावा लागला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतर्गत ही मालिका खेळवली जात आहे.

विशेष म्हणजे हा सामना गमावल्यानंतर पाकिस्तानी संघ आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीच्या शर्यतीतून जवळपास बाहेर पडला आहे. या विजयाचा फायदा इंग्लंडला झाला आहे. इंग्लंडने पाकिस्तानवर विजय मिळवल्यानंतर जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत मोठा बदल झाला आहे. मात्र, याचा टीम इंडियाच्या स्थानावर कोणताही परिणाम झालेला नाही. भारतीय संघ अजूनही पहिल्या क्रमांकावर आहे. तर पाकिस्तानच्या संघाला सहाव्या कसोटी पराभवानंतर थेट तळाचे स्थान मिळाले आहे.

## घरच्या मैदानावर पाकिस्तानचा लाजिरवाणा पराभव; मुलतान कसोटीत इंग्लंडचा 1 डाव 47 धावांनी विजय

वृत्तसंस्था
■ मुलतान

इंग्लंडने पहिल्याच मुलतान कसोटीत पाकिस्तानचा ४७ धावा आणि एका डावाने लाजिरवाणा पराभव केला आहे. पाकिस्तानने पहिल्या डावात ५५६ धावा करूनही संघावर पराभवाची नामुष्की ओढवली आहे.

इंग्लंडच्या संघाने मुलतानमधील खेळपट्टीवर विक्रमी ८२३ धावा करत पाकिस्तानच्या संघाला बॅकफूटवर टाकले. इंग्लंडकडून जो रूटने २६५ धावा तर हॅरी ब्रुकने ३१७ धावा करत त्रिशतक झळकावले आहे. पाकिस्तानला पुन्हा एकदा घरच्या मैदानावर मोठा लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये पाकिस्तानचा हा सलग सहावा पराभव आहे. गेल्या ९ कसोटी सामन्यांमधील पाकिस्तानचा हा सातवा पराभव आहे. गोलंदाजांसाठी उपयुक्त नसलेल्या खेळपट्टीवर इंग्लंडने सामना आपल्या बाजूनो वळवला. नाणेफेक गमावल्यानंतर आणि दीड दिवसांहून अधिक काळ क्षेत्ररक्षण केल्यानंतर हॅरी ब्रुकचे त्रिशतक आणि जो रूटच्या कारकिर्दीतील सर्वोच्च धावसंख्या (२६२ धावा) यांच्या जोरावर इंग्लंडने ८२३ धावा करून अनेक विक्रम मोडले.

### १४७ वर्षांच्या कसोटी इतिहासात पहिल्यांदाच असं घडलं



### ५०० प्लस धावसंख्या रचूनही पराभवाची नामुष्की

*पाकिस्तानसाठी हा त्यांच्या क्रिकेट इतिहासातील सर्वात लाजिरवाणा पराभव आहे. या पराभवासह पाकिस्तान क्रिकेटच्या नावावर एक लाजिरवाणा विक्रमही जमा झाला आहे. १४७ वर्षांच्या कसोटी क्रिकेटच्या इतिहासात इतर कोणत्याही संघाला अशाप्रकारे पराभवाचा सामना करावा लागला नाही. या सामन्याच्या पहिल्या डावात पाकिस्तान संघाने ५५६ धावा केल्या होत्या. यानंतर पाकिस्तानची दुसऱ्या डावाची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. पण आगा सलमान आणि आमेर जमाल यांच्या भागादारीने पाकिस्तानला सामन्यात कायम ठेवले. पण अखेरच्या दिवशी दोघेही फार काळ मैदानावर टिकू शकले नाहीत आणि पाकिस्तानचा संघ सर्वबाद झाला. कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात ही पहिलीच वेळ आहे की पहिल्या डावात ५०० हून अधिक धावा करूनही एखाद्या संघाने कसोटी सामना गमावला आहे.*

## वर्सोव्यात साकारले सावित्रीबाई फुले बोटॅनिकल गार्डन

### अमृता फडणवीस यांच्या हस्ते झाले लोकार्पण



प्रतिनिधी
■ मुंबई

वर्सोव्याच्या कॉंक्रीटच्या जंगलात सुमारे ५ एकर जागेवर आकर्षक सावित्रीबाई फुले बोटॅनिकल गार्डन साकारले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी, प्रसिद्ध गायिका, बँकर अमृता फडणवीस यांच्या हस्ते वर्सोवा विधानसभा क्षेत्रातील जोगेश्वरी पश्चिम येथील सदर उद्यानाचे आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडून उद्घाटन करण्यात आले. येथील स्थानिक भाजप आमदार डॉ. भारती लव्हेकर यांनी त्यांच्या फंडातून येथे आगळे वेगळे उद्यान साकारून वर्सोव्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

यावेळी प्रसिद्ध अभिनेत्री निवेदिता सराफ, प्रसिद्ध अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर, संगीतकार डब्बू मलिक, संगीतकार जसमिंदर कौर, निर्माते कार्यकर्ते शशीरंजन, माजी नगरसेवक योगीराज दाभाडकर, माजी नगरसेविका रंजना पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अमृता फडणवीस म्हणाल्या की, डॉ. भारती लव्हेकर यांनी दूरदृष्टी ठेवून येथील सध्याच्या कॉंक्रीट जंगलात लाडक्या बहिणींना ऑक्सिजन मिळण्यासाठी सावित्रीबाई फुले बोटॅनिकल गार्डन येथे साकारले आहे. या उद्यानात फुलपाखरू उद्यान, डेन फॉरेस्ट, हर्बल पार्क, व्यासपीठ, गजीबो आणि अनेक सुविधा असून जे पाहिजे ते सर्व या उद्यानात उपलब्ध आहे. सर्व नागरिकांनी या उद्यानाचा लाभ घ्यावा आणि आपला परिसर सुंदर व स्वच्छ ठेवावा असे त्यांनी आवाहन केले. आम्ही डॉ. भारती लव्हेकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून त्या माझ्या पाठीमागे उभे असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. जनतेत राहून त्यांना सेवा सुविधा मिळवून देण्यासाठी मला नेहमी आवडते, असे त्यांनी सांगितले.


सिमेंटच्या जंगलात वर्सोव्याच्या नागरिकांना ऑक्सिजन कसा चांगला मिळेल यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. असे आपल्या प्रास्ताविक भाषणात डॉ. भारती लव्हेकर म्हणाल्या तर,अभिनेत्री निवेदिता सराफ म्हणाल्या , मी याच मतदार संघात रहाते. डॉ. भारती लव्हेकर यांनी सिमेंटच्या जंगलात साकारलेल्या उद्यानाचा मी नक्कीच आनंद घेईन. त्यांनी या भागाला अनेक सुविधा देत या परिसराचा वटवृक्ष केला आहे. अश्या प्रकारची उद्याने मुंबईत ठिकठिकाणी साकारली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर यांनी या भागात एक चांगले उद्यान उभारून या भागाचा कायापालट केला आहे. अश्या प्रकारची चांगली उद्याने वर्सोवा भागात साकारली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी भर पावसात येथील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## विश्वविजेत्या टीम इंडियातील स्टार खेळाडू घडविण्यात टाटा समूहाचा सिंहाचा वाटा

### रोहितसह अनेक क्रिकेटपटूंनी व्यक्त केली कृतज्ञता

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतातील प्रसिद्ध टाटा समुहाचे चेयरमन आणि उद्योग जगताचे 'आधारवड' रतन टाटा यांचे बुधवारी ९ ऑक्टोबर रोजी निधन झाले. रतन टाटा यांच्या निधनाच्या वृत्ताने क्रीडा विश्वही शोकाकुल झाले आहे. रतन टाटा यांनी केवळ देशाची अर्थव्यवस्थाच पुढे नेली नाही तर देशात क्रिकेट खेळाला पुढे नेण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली. रतन टाटा यांनी टाटा समूहाअंतर्गत खेळाडूंना नोकऱ्या,





आर्थिक मदत तसेच महत्त्वाच्या संधी दिल्या.

विश्वविजेत्या टीम इंडियातील अनेक स्टार खेळाडू घडवण्यात टाटा उद्योगसमूहातील कंपन्यांचा सिंहाचा वाटा आहे. रतन टाटांनी खेळासाठी दिलेल्या योगदानाबद्दल टीम इंडियाचा विद्यमान कर्णधार रोहित शर्मासह अनेक क्रिकेटपटूंनी टाटांच्या खेळासाठीच्या योगदानाबद्दल मोठे आभार मानले आहेत.

फारूक इंजिनियर (टाटा मोटर्स), मोहिंदर अमरनाथ (एअर इंडिया), जवागल श्रीनाथ (इंडियन एअरलाइन्स), संजय मांजरेकर (एअर इंडिया), किरण मोरे (टीएससी), रुसी सुरती (आयएचसीएल), संदीप पाटील (टाटा ऑइल मिल्स), व्हीव्हीएस लक्ष्मण (इंडियन एअरलाइन्स), युवराज सिंग (इंडियन एअरलाइन्स), हरभजन सिंग (इंडियन एअरलाइन्स), सुरेश रैना (एअर इंडिया), रॉबिन उथप्पा (एअर इंडिया), मोहम्मद कैफ (इंडियन एअरलाइन्स), निखिल चोप्रा (इंडियन एअरलाइन्स), इरफान पठाण (एअर इंडिया), आरपी सिंग (एअर इंडिया), दिनेश मोंगिया (इंडियन एअरलाइन्स), अजित आगरकर (टाटा स्टील), रोहन गावस्कर, रमेश पोवार आणि अगदी अलीकडे शार्दुल ठाकूर (टाटा पॉवर) जयंत यादव (एअर इंडिया) आणि झुलन गोस्वामी (एअर इंडिया) या खेळाडूंनाही टाटा समुहाने पाठिंबा दिला आहे आणि हे खेळाडू टाटा समुहाकडून खेळले आहेत. टाटा समुहातील कोणत्या कंपनीकडून हे खेळाडू खेळले आहेत,

*'खूप मोठ्या मनाचा माणूस. रतन टाटा सर तुम्ही कायमच स्मरणार राहाल... एक असा माणूस ज्याने नेहमीच इतरांची काळजी घेतली आणि सगळ्यांचं चांगलं व्हावं यासाठी आयुष्यभर जगले." 'खूप मोठ्या मनाचा माणूस. सर तुम्ही कायमच स्मरणार राहाल... एक असा माणूस ज्याने नेहमीच इतरांची काळजी घेतली आणि सगळ्यांचं चांगलं व्हावं यासाठी आयुष्यभर जगले.'*

***- रोहित शर्मा, कर्णधार टीम इंडिया***

## रतन टाटा यांच्यासारखे उद्योजक देशाला मिळावेत - अनुराधा गोरे

### राज्यभर महावाचन आणि ग्रंथमहोत्सवाचं विलेपार्ले येथे आयोजन

■ मुंबई

महाराष्ट्र शासनातर्फे संपूर्ण राज्यभर महावाचन आणि ग्रंथ महोत्सव आयोजित करण्यात येत आहेत, त्या उपक्रमाचा भाग म्हणून शिक्षण निरिक्षक पश्चिम विभागीय युआरसी पाच अंतर्गत ग्रंथ प्रदर्शन , पुस्तक मेळावा विलेपार्ले येथील पार्ले टिळक विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून शहीद कॅप्टन विनायक गोरे यांच्या मातोश्री अनुराधा गोरे , कवी विजय सावंत उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला रतन टाटा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर गोरे यांनी जे.आर.डी व रतन टाटा यांच्या कार्याचा गौरव केला आणि त्यांच्या मार्गाने जाणारे भावी उद्योजक देशाला मिळावेत अशी अपेक्षा व्यक्त



केली.तसेच सैन्यात जाऊन देशाचे रक्षण करण्याचे आवाहन केले. तर विजय सावंत यांनी आपल्या कवितांचे वाचन केले. व्यासपीठावर शिक्षण उपनिरीक्षक नीशा वैदू आणि शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता मिठे उपस्थित होत्या, यावेळी विविध शाळातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला त्यानंतर विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली.

## अनुसूचित जाती आणि इतर मागास वर्गाच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध

### यंदाच्या दसरा मेळाव्याला रेकॉर्डब्रेक गर्दी होणार, राहुल शेवाळे यांना विश्वास

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देणे, ओबीसींची नॉन क्रिमीलियर मर्यादा १५ लाखांपर्यंत वाढवण्याची केंद्राला विनंती, असे महत्वाचे निर्णय घेऊन मागास समाजाच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे शिवसेना उपनेते माजी खासदार राहुल शेवाळे यांनी म्हटले आहे. यंदाचा आजचा दसरा मेळावा हा महायुतीचा विजयी संकल्प मेळावा असून तो रेकॉर्ड ब्रेक गर्दीत होईल, असा विश्वास शेवाळे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

आज आझाद मैदानात शिवसेनेचा दसरा मेळावा होणार असून त्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संबोधित करणार आहेत. विचार आणि शिवसेना दसरा मेळावाची एक वेगळी सांगड आहे आणि तो वारसा आता एकनाथ शिंदे घेऊन पुढे जात आहेत, असे ते म्हणाले. आजचा मेळावा हा महायुतीच्या विजयाचा संकल्प मेळावा असेल, ते म्हणाले. ज्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले त्यांच्या मेळाव्यांची तुलना शिवसेनेच्या मेळाव्यासोबत होऊ शकत नाही, अशी टीका शेवाळे यांनी केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमुळे महिला वर्गात दसरा मेळाव्याबाबत उत्सुकता आहे. आजच्या मेळाव्यात महिलांची संख्या प्रचंड असेल. दोन लाखांहून अधिक शिवसैनिक दसरा मेळाव्याला उपस्थित राहतील, असा विश्वास शेवाळे यांनी व्यक्त केला. महायुतीत काही बिनसलले नाही. लवकरच महायुतीकडून जागा वाटप जाहीर केले जाईल, असे ते म्हणाले.

शेवाळे यांनी राज्य सरकारने अनुसूचित जातींसाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. ते म्हणाले की, राज्य मंत्रिमंडळाने गुरुवारी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठीच्या अध्यादेशाच्या प्रारूपास मान्यता दिली आहे. वैधानिक दर्जा प्राप्त झाल्यानंतर अनुसूचित जातींच्या विकासाला चालना मिळेल. या घटकांसाठी राबवलेल्या जाणाऱ्या योजनांना पाठबळ मिळेल, असे शेवाळे म्हणाले.

## दसऱ्यानिमित्त ओम साईनाथ मित्र मंडळातर्फे गोरेगावमध्ये भंडारा

### आजच्या होम-हवन सोहळ्याला मान्यवर राहणार उपस्थित

■ मुंबई

दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर ओम साईनाथ मित्र मंडळातर्फे साई पालखी व साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या ३४ वर्षापासून सुरू असलेला सदर धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात जलोषात साजरा करण्यात येतो. गोरेगाव पूर्व व पश्चिम तसेच उपनगरातील अनेक नामवंत, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व साईभक्त या ठिकाणी येऊन साईबाबांचे आशिवीद घेतात. गोरेगाव पश्चिम येथील लिंक रोड, इंदिरानगर १मध्ये दसऱ्यानिमित्त ओम साईनाथ मित्र मंडळातर्फे साई पालखी व साई भंडारा सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले आहे. 11 ऑक्टोबरच्या पालखी मिरवणूक सोहळ्यानंतर 12 तारखेला सकाळी नऊ वाजता हवन, पूजा, अभिषेक व पादुका स्थापना करण्यात येणार असून सकाळी ११ वाजता श्री साईंची महाआरती व १२ ते ५.३० दरम्यान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, साई पालखी व साई भंडारा सोहळ्याचे आयोजक जितेंद्र माणिक इगवे असून अध्यक्ष महेश शिवराम जाधव, सचिव तुषार जितेंद्र इगवे, खजिनदार दिलीप जाधव आहेत.

साईबाबांच्या चरणी आशीर्वाद व धार्मिक सोहळयाला आमदार विद्या ठाकूर, समीर देसाई, अमोल कीर्तीकर, माधवी राणे, श्रीकला पिल्ले उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, सदर हार्दिक सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रमुख कार्यकर्ता आतिश मनोज गायकवाड, आकाश वायदंडे, संदेश चव्हाण, मनीष रोलकर, अथर्व जाधव यांच्यासह अनेक साईभक्त विशेष मेहनत घेतात. सदर मंडळाचे मुख्य आधारस्तंभ ग्यानचंद पटवा, अजय धनेश्वर, प्रदीप वाडेकर, दशरथ रसाळ आहेत, तर सहयोग प्रवीण शिंदे वैभव रहाटे यांचे आहेत. दरम्यान, साई पालखीला बांगुर नगर पोलीस ठाणे व गोरेगाव पोलीस ठाण्याचे विशेष सहकार्य मिळते.


## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### निविदा सूचना क्र. ३० (२०२४-२५)

कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरूस्ती कामाकरीता म्हाडा/ मुं.म.पा./ सा.बां. विभाग / कें. सा.बां.वि./ रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नांव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम (विना परतावा) (GST सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
| १ | इ. क्र. 29, कामाठीपुरा, 14 वी गल्ली (मंडळ निधि) | 1,73,189/- | 2000/- | 4000/- | 236/- | दि. १४.१०.२०१४ ते दि. २१.१०.२०२४ सकाळी ११ ते दु. १ पर्यंत | दि २१.१०.२०१४ ते २३.१०.२०२४ सकाळी ११ ते दु. १ पर्यंत | ८ महिने | नऊ व त्यावरील |
| २ | इ. क्र. 3B-7, डंकन रोड क्रॉस लेन, काझीपुरा स्ट्रिट, ( मंडळ निधि ) | ८,४७,८३७/- | ८,४७८.०० | १७,०००.०० | ५९०.०० | | | १२ महिने | सात व त्यावरील |

१ जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युन्तम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय नूनतम देकाराच्या निविदाकास लेखी विचारणा करुन त्यानी प्रथम न्यूनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मूंजर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.
२ कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग / के.सा.बां.वि./ रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३ म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी/ निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
५ इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी, मं. इ. दु. व पु. मंडळ यांच्या नांवावर द्यावी.
६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३ यांचेकडून रकाना क्र. ७ मध्ये विहीत केलेल्या विनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृती केली जाईल. तसेच स्विकृती केलेल्या मोहरबंद निविदा शक्य झाल्यास रकाना क्र. ८ मधील शेवटच्या दिवशी कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात संध्या. 2.30 वा. नंतर उघडल्या जातील.
७. संयुक्तबोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
८. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामचा / वास्तु बांधकामाचा किंमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता (सिव्हिल इंजिनियर) आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
९. उप-ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपती विचारात घेतली जाणार नाही.
१०. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
११. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

सही/-
(एन. जे. चव्हाण)
कार्यकारी अभियंता ई-२ विभाग (अ.का.)
मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई

CPRO/A/980

Follow us: @mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

वायू विद्युत केंद्र, उरण येथे खालील कामांच्या पुरवठा / कामांसाठी अनुभवी व प्रतिष्ठित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या जात आहेत.

| ई-निविदा | वर्णन | अंदाजित खर्च/ ई.एम.डी. (रु.) | विक्री कालावधी | भरण्याची अंतिम तारीख (१५:०० तासांपर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा ३००००५०५०२ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे HP फीड स्टेशन व्हॉल्व्ह बदलण्याचे काम करणेबाबत. | १९.६० लक्ष १३,१००/- | ११.१०.२०२४ ते २४.१०.२०२४ | २५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५११४८ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे ACC पाइपलाइन उच्च तापमान उष्णता प्रतिरोधक कोटिंगचे काम करणेबाबत. | २७.१२ लक्ष ३०,६२६/- | ११.१०.२०२४ ते २४.१०.२०२४ | २५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१९२८ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे WHRP बॉयलर LP बाष्पीभवक हेडरचा पुरवठा करणेबाबत. | ०२.३३ लक्ष ५,८३८/- | ११.१०.२०२४ ते ३०.१०.२०२४ | ३१.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२३१९ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे BID, BYD हायड्रोलिक सिलेंडरसाठी कंडेन्सेट व्हॉल्व्ह आणि सील किटच्या डायफ्रामचा पुरवठा करणेबाबत. | ०९.७७ लक्ष १३,२७४/- | ११.१०.२०२४ ते ३०.१०.२०२४ | ३१.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२३२० | वायू विद्युत केंद्र, उरण येथे आवारात Isolaing valve च्या देखभालीसाठी, अग्निशमन जलवाहिनीवरील पाण्याच्या गळती थांबवण्याचे काम आणि ओव्हर हेड / ग्राउंड फायर फायटिंग पाइपलाइन बदलण्यासाठीच्या कामाचा वार्षिक करार करणेबाबत. (जेव्हा आवश्यक असेल तेव्हा). | ०८.२४ लक्ष ११,७५०/- | ११.१०.२०२४ ते २४.१०.२०२४ | २५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२३४९ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे दर कराराच्या आधारावर ऑनलाइन पद्धतीने एचपी / एलपी स्टीम, पाणी आणि हवेच्या गळतीचे काम करणेबाबत. | ०७.३९ लक्ष १०,८९४/- | ११.१०.२०२४ ते २४.१०.२०२४ | २५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२३५० | वायू विद्युत केंद्र, उरण येथे उपस्थित WHR Horizontal बॉयलर ट्यूब लिकेजच्या कामासाठी वार्षिक देखभाल करार करणेबाबत. | १३.३८ लक्ष १६,८८५/- | ११.१०.२०२४ ते २४.१०.२०२४ | २५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२३५१ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे GT LUWA कूलर फॅन्सना सुधारित GI वायर जाळी बसविण्यासोबत Louvers फ्लॅप असेंबली आणि GI बॉक्स होल्डिंग फ्लॅप असेंबलीची दुरुस्ती / सुधारणा करण्याचे काम करणेबाबत. | ०९.७३ लक्ष १३,२३९/- | ११.१०.२०२४ ते २४.१०.२०२४ | २५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२३५६ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे FST आणि कंडेन्सेट टाक्यांची तपासणी व साफसफाईचे काम करणेबाबत. | ०२.८० लक्ष ६,३००/- | ११.१०.२०२४ ते २४.१०.२०२४ | २५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२३६० | वायू विद्युत केंद्र, उरण येथे सीमेन्सच्या दुरुस्तीचे / सुधारणेचे काम 108 मेगावॅट G.T. कंबस्टर गॅस बर्नर्ससह उष्णता उपचार कार्य करणेबाबत. | ११.२५ लक्ष १४,७५२/- | ११.१०.२०२४ ते २४.१०.२०२४ | २५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२३६१ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे आवश्यक सामग्रीच्या पुरवठ्यासह ए.सी.सी. पॅनेल एमसीसी स्विचगियर्सचे रेट्रोफिटिंग करणेबाबत. | ५२.२५ लक्ष ५५,७५३/- | ११.१०.२०२४ ते ३०.१०.२०२४ | ३१.१०.२०२४ |

सर्व निविदांसाठी निविदा किंमत रु.११८०/- निविदा खर्च आणि ई.एम.डी. केवळ ऑनलाइन भरणे. आमच्या वेबसाइटवर दिनांक **११.१०.२०२४** पासून विक्रीसाठी निविदा उपलब्ध आहेत किंवा अधिक तपशीलासाठी कृपया आमच्या वेबसाइटवर भेट द्या https://eprocurement.mahagenco.in संपर्क तपशील: - EE (P&C) - 91-9167007841 विक्रेत्यांना विनंती कि ई-निविदेसाठी फर्म नोंदणी करून घ्यावी. कृपया आमच्या वेबसाइटवर लॉग इन करा https://eprocurement.mahagenco.in

Sd/-
Chief Engineer
GTPS Uran

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

कौशल्यम् बलम्



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन

# नव्या महाराष्ट्राची, नवी संकल्पना!

कौशल्य विकास प्रशिक्षण भारतीय युवकांच्या जीवनात नवी पहाट आणेल.
विकसित भारत घडविण्यात कौशल्य विकास विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका राहील...

– नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री



### संविधान मंदिर

- भारताच्या संविधानाबद्दल आयटीआयच्या विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी राज्यातील ४३४ आयटीआयमध्ये संविधान मंचाची स्थापना
- नव्या पिढीत लोकशाहीच्या मूल्यांच्या जोपासनेसाठी उपक्रम
- महिन्यातून एकदा होणार संविधान विषयावर चर्चा



### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

- उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) द्वारे उपलब्ध करून प्रशिक्षणार्थींना रोजगारक्षम बनविण्यासाठी योजना
- १२वी, आयटीआय, पदविका, पदवी व पदव्युत्तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अनुभव घेण्याची संधी
- ६ महिन्याच्या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन मिळणार

नोंदणीसाठी संकेतस्थळाला भेट द्या
https://rojgar.mahaswayam.gov.in किंवा https://cmykpy.mahaswayam.gov.in
अधिक माहितीसाठी संपर्क - ०२२-२२६२५६५१/०२२-२२६२५६५३



### छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करियर शिबिर

- युवकांना कौशल्य शिक्षण आणि रोजगार मार्गदर्शनासाठी जिल्हास्तर आणि विधानसभानिहाय करियर मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन
- १ लाख ७४ हजार विद्यार्थी आणि १५ हजार ५०० पालकांचा सहभाग (६ मे ते ६ जून २०२३ दरम्यान)



### संत गाडगेबाबा स्वच्छ भारत प्रबोधिनी

- कौशल्य विद्यापीठ संचालित ठाण्यातील कोपरी येथे ६ मार्च, २०२४ रोजी पहिल्या स्वच्छ भारत प्रबोधिनीचे उद्घाटन
- स्वच्छ भारत अभियानासाठी कुशल मनुष्यबळाची निर्मिती करण्याचा उद्देश



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना

- राज्यातील होतकरू महिलांच्या नेतृत्वातील स्टार्टअप्सना मिळणार पाठबळ
- योजनेसाठी १०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद
- सुमारे ५०० स्टार्टअप्सना २५ लाखांपर्यंतचे आर्थिक सहाय्य देणार




### आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

- १००० नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन
- प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार
- राज्यात प्रतिवर्षी साधारण १ लाख ५० हजार युवक-युवतींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण मिळणार



### स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी

- युवकांना परदेशात रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी प्रबोधिनीची स्थापना
- जपानी, फ्रेंच, जर्मन, हिब्रू या सारख्या भाषांचे युवकांना प्रशिक्षण
- मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर येथे प्रबोधिनीची केंद्रे असतील



### महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ

- युवकांना अधिक प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, हे विद्यापीठाचे ध्येय
- पनवेल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या आवारात विद्यापीठाच्या मुख्य वास्तूचे भूमिपूजन
- ऑन द जॉब प्रशिक्षणासाठी कौशल्य विद्यापीठाचे उद्योगांबरोबर करार

नमो महारोजगार मेळावा

### नमो महारोजगार मेळावा

- सन २०२३-२४ मध्ये नागपूर, लातूर, अहमदनगर, बारामती (पुणे) आणि ठाणे येथे आयोजित नमो महारोजगार मेळाव्यामध्ये १४९५ उद्योजकांचा सहभाग
- १ लाख ५७ हजार १३९ उमेदवारांचा सहभाग
- ६० हजार ६९१ उमेदवारांची झाली निवड



### २८५ 'आयटीआय'चे नामकरण

- महापुरुषांच्या कार्यापासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी महत्वाचा निर्णय
- राजमाता जिजाऊ शा. औ. प्र. सं., छत्रपती शिवाजी महाराज शा. औ. प्र. सं., भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शा. औ. प्र. सं., सावित्रीबाई फुले शा. औ. प्र. सं., भगवान बिरसा मुंडा शा. औ. प्र. सं., महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी शा. औ. प्र. सं. इत्यादी



### प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र

- महाराष्ट्रातील ५११ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांची सुरुवात
- रोजगारासाठी तरुणांचे गावातून शहरात स्थलांतर होऊ नये, यासाठी केंद्रांची स्थापना
- गावामध्येच युवकांना कौशल्य प्रशिक्षण मिळण्यासाठी केंद्रांची मदत



### हर घर दुर्गा अभियान

- शासकीय औद्योगिक संस्थांमधील विद्यार्थिनींसाठी आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण
- शारीरिक शिक्षणाप्रमाणेच वर्षभर विद्यार्थिनींसाठी कराटे, जुडो यासारख्या स्वरक्षणाच्या पायाभूत प्रशिक्षणाच्या आठवड्यातून २ तासिका होणार



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

मंगल प्रभात लोढा
मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता

डी.जी.आय.पी.आर/आरओसी/२०२४-२५/क्र.५/मी ४४६६

mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन